नं. ७
विषय
संग्रहालय क्रमांक
६७
सं. ठाण
मा. सहस्रबुद्धे
संगीत सं... कन्याश्री
संगीत स...

# संगीत सीताशुद्धि.

कै० सौभाग्यवती काशीबाई.

( शके १८१५ ...

१४९

# संगीत सीताशुद्धि.

हें नाटक,

कै० सौभाग्यवती काशीबाई,

रा. सा. बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे यांची ज्येष्ठ कन्या,

ह्यांनीं रचिलें,

तें

केवळ त्यांचें स्मारक ह्मणून आप्तांस आणि परिचितांस

देण्याकरितां खासगी रीतीनें

मुंबईत

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्रीच्या वडिलांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

ह्या ग्रंथाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली आहे.

इ० स० १८९७.

ग्रंथकर्त्रींची निष्ठा ज्या महापुरुषाचे ठिकाणीं निस्सीम होती, आणि ज्यास ती आपला देव मानीत असे, त्या

**श्रीअण्णांस**

हें पुस्तक अर्पण केलें आहे.

# प्रस्तावना.

प्रस्तावना हा ग्रंथाचा भाग असतो. तेव्हां, ज्याच्या हातचा ग्रंथ असतो, त्याच्याच हातची प्रस्तावना बहुधा असते. ही मनुष्याची योजना झाली. परंतु, ह्या जगाच्या इतर सर्व व्यवहारांमध्यें मनुष्याची कृति असून शिवाय ईश्वरी सूत्र ह्मणून कांहीं असतेंच असतें, त्याप्रमाणें ग्रंथरचनेंतही असतें. तसा कांहीं प्रकार ह्या प्रस्तावनेचा झाला आहे. हें नाटक सौभाग्यवती काशीबाई, रावसाहेब बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे, बी. ए. एज्युकेशनल इन्स्पेक्टर, दक्षिणभाग, ह्यांची कन्या, ह्यांनीं लिहिलें. तें, मी खानदेशांत सरकारी नौकरीच्या संबंधानें रावसाहेबांच्या सहवासांत असतां, माझ्या दृष्टीस पडलें. तें मला फार चांगलें वाटलें. ह्मणून तें छापून काढण्याविषयीं रावसाहेबांस सुचविलें. तें त्यांना बरें वाटलें. परंतु सौ० काशीबाई ह्या जात्याच फार मर्यादशील, सत्वशील आणि साध्या वृत्तीच्या असल्यामुळें माझ्या सूचनेस अनुमोदन देण्यास त्यांस फार संकोच वाटला. पुढें माझी बदली खानदेशांतून नाशिकास झाल्यामुळें तो विचार तितकाच राहिला. नंतर, सौ० काशीबाईचें दुखणें थोडें थोडें वाढून, त्यानें त्यांचा अंत झाला. तेव्हां रावसाहेब सहस्रबुद्धे ह्यांस अतिशयित दुःख झालें. पुढें माझ्या मोठ्या आग्रहानें

त्यांनीं, हें नाटक, काशीबाईंचें लहानसें स्मारक ह्मणून छापण्याचें कबूल केलें. तरी दुःखामुळें त्यास त्यांचा हात वाहीना. ह्मणून ह्या पुस्तकाची ही प्रस्तावना लिहिणें मला पतकरावें लागलें. ह्या सगळ्या व्यवहारांत, विरहदुःख, प्रेम आणि मृतस्मरणसुख, ह्यांचा मोठा झगडा आहे. त्याची कल्पना रसिक वाचकांस सहज होण्यासारखी आहे. आणि ह्यामुळें हें, एके प्रकारीं अत्यंत दुःखप्रद आणि एके प्रकारीं प्रेमोत्तेजक असें प्रस्तावनालेखनाचें काम मीं पतकरिलें आहे. आणि ह्या प्रस्तावनेंत काशीबाईंच्या चरित्राचें कथन थोडक्यांत करण्याचें योजिलें आहे. आणि खरोखर ह्मटलें तर ह्या प्रस्तावनेचा शिरोभाग तें चरित्रच आहे.

काशीबाई ह्यांचें जन्म शके १७९५ च्या श्रावण शुद्ध षष्ठीस पुणें येथें झालें. त्या लहानपणीं बहुतेक आपल्या आजोबांजवळ, ह्मणजे रामचंद्र चिंतामण सहस्रबुद्धे, पेनशनर, ह्यांजपाशीं असत. कां कीं त्यांस त्यांचा लळा फार असे. रामचंद्रपंत ह्यांस आपले वयाचे पंधरासोळा वर्षांपासूनच अध्यात्मरामायण, भागवत इत्यादि ग्रंथ वाचण्याचा नाद असे. आणि त्यांच्या येथें नेहमीं त्या प्रकारच्या गोष्टी चालत असत. त्या काशीबाईंच्या कानीं पडत. तेणेंकरून अध्यात्मरामायण, भागवत इत्यादि ग्रंथांतील बहुतेक कथा त्यांस चांगल्या पाठ झाल्या होत्या. त्या गोष्टी त्या चार वर्षांच्या असतां देखील बोबड्या शब्दांनीं सांगत असत. तें घरच्या सगळ्या माणसांस—आणि विशेषेंकरून त्यांच्या आजोबांस—मोठें कौतुक वाटत असे.

आजोबांनीं त्यांस लिहायास आणि वाचायास थोडें थोडें घरच्या घरीं शिकविलें. शिवाय त्यांनीं त्यांना अनेक स्तोत्रें शिकविलीं होतीं. तीं त्या तोंडपाठ ह्मणत असत. त्यांत त्यांस प्रयास पडले नाहींत. कां कीं काशीबाईंची वृत्तिच अशी होती कीं, आ-

जीवांनीं जें काय सांगावें तें त्यांनीं मनोभावें करावें. अशी वृत्ति मुलाचे ठायीं असणें, हें त्या मुलास भूषण आहे, तसें तें त्या मुलाच्या गुरूचें मोठें भाग्य होय. आणखी काशीबाई कोणत्याही शाळेंत न जातां नाटक लिहितां येण्याइतकें शिकल्या होत्या, हें ह्याच साहित्याचें फल होतें. आणखी मुलें ह्या चिकण मातीच्या बाहुल्या आहेत; त्यांस घरचीं मोठीं माणसें जसें स्वरूप देतात तसें प्राप्त होतें; ह्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. ह्याविषयीं विशेष चर्चा न करितां आह्मी आमच्या देशांतल्या स्त्रीशिक्षणेच्छु मंडळीस एवढेंच सुचवितों कीं, मुलींचें शिक्षण होण्यास त्या शाळांत गेल्याच पाहिजेत–शाळा उत्तम झाल्या पाहिजेत—शिक्षक चांगले नेमिले पाहिजेत—त्यांच्याकरितां वेगळीं पुस्तकें लिहिलीं पाहिजेत—ह्या साहित्याची वाट पहात बसण्याचें कारण नाहीं. मुलींच्या शिक्षणाची सिद्धता, सध्याच्या स्थितींत देखील, त्यांच्या घरच्या वडील माणसांस, स्वतःच्या प्रयत्नांनीं करतां येण्यासारखी आहे.

प्रपित्यांच्या सहवासानें आणि शिक्षणानें काशीबाईस ग्रंथावलोकनाची संवय लागली. त्यांनीं प्रथम कांहीं सोपीं सोपीं मराठी पुस्तकें वाचिलीं; मग, मराठींतलीं वेणीसंहार, उत्तररामचरित्र, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, किर्लोस्करांनीं केलेलीं संगीत नाटकें, इत्यादि पुस्तकें वाचिलीं. त्यांच्या योगानें त्यांचें मन प्रशस्त आणि अधिक भक्तिमान् झालें. आणि लहानपणापासूनच त्यांच्या वर्तनांत त्यांच्या अंतःकरणवृत्तीचें पवित्रपण दृश्यमान होऊं लागलें. आणखी ह्या सगळ्यांच्या योगानें त्यांच्या अंतःकरणांतल्या नैसर्गिक कवित्वशक्तीस हळू हळू उत्तेजन मिळूं लागलें.

ह्या पुस्तकांच्या वाचनाच्या योगानें आणि वारंवार रामायण व

भागवत इत्यादि पुराणें कानावरून गेल्यानें संस्कृत मुळींच न शिकूनही अध्यात्मरामायणांतील वेदांताशिवाय इतर भागांचा अर्थ त्यांस चांगला सांगतां येत असे. शाळेंत न गेल्यामुळें त्यांस व्याकरण आणि शुद्ध लेखन हे विषय चांगले येत नव्हते. तथापि त्यांची बोलण्याची शैली सामान्य वाचकांपेक्षां फार प्रौढ असे.

काशीबाईंचें लग्न आठव्या वर्षीं रा० रा० गणेश रामचंद्र फडके सबइंजिनीयर यांचे ज्येष्ठ चिरंजीवांबरोबर झालें. हा वधूवरांचा जोडा फार चांगला होता. लग्न झाल्यावर, त्या, त्यांचे वडील नाशिकास असतांना मधून मधून बरेच दिवस त्यांचे जवळ रहात असत. त्या आपल्या वडिलांबरोबर नाटक पहावयास गेल्या म्हणजे तें लक्षपूर्वक पाहून एखाद्या चांगल्या विद्वानाप्रमाणें त्यांत कोठें काय दोष आहेत हें सहज सांगत. परमेश्वराची कृपा असली ह्मणजे माणसांच्या गुणांस भर पडण्याचें साहित्य सहज प्राप्त होत असतें. कवित्वशक्तीच्या अभिवृद्धीस गायनाचें आणि तालसुराचें ज्ञान फार साधक होत असतें. तें ज्ञान काशीबाईंस आयतें घरच्या घरांत, अगदीं अनायासें, जवळच्या जवळ मिळालें. रावसाहेब बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे हे स्वभावतःच मोठे रसिक आहेत. त्यांस गाण्याचा नाद चांगला आहे. आणि त्या विषयांत त्यांची गति फार चांगली आहे. व ते स्वतःही थोडेंसें गातात. त्यांचेकडे नेहमीं गवयी लोक येऊन त्यांचे घरीं वारंवार गाण्याचे प्रसंग होत असत. तीं गाणीं काशीबाई मनापासून ऐकत. व त्यांत त्यांची गति चांगली होऊन बहुतेक प्रसिद्ध रागांची माहिती त्यांस झाली. गवयानें चीज ह्मटल्यावर अमुक रागांत ती ह्मटली, असें त्या सहज सांगत. व अमुक गवयी अमुक योग्यतेचा आहे, हेंही त्यांस चांगलें कळे. ह्याप्रमाणें वारंवार गाणें कानावरून गेल्याकारणानें त्या स्वतः कविता

आणि पदें शुद्ध आणि सुस्वर ह्मणत असत. पुढें त्यांस हळू हळू स्वतः कविता करण्याचा नाद लागला, व त्यास वरील गोष्ट चांगली साधनीभूत झाली. त्या आपोआप सहजगत्या चांगल्या कविता करितात, असें पाहून त्यांच्या वडिलांनीं त्यांस एखादें संगीत नाटक लिहिण्याविषयीं सांगितलें. व कोणता भाग घेऊन त्यावर नाटक करूं असें जेव्हां त्यांनीं त्यांस विचारिलें, तेव्हां जो भाग भूमिका घेऊन आजपर्यंत कोणीं त्यावर नाटक केलें नाहीं, असा भाग घे, असें त्यांनीं सांगितल्यावरून,व काशीबाईस रामायणाची आवड फार असल्याकारणानें, किर्लोस्करांच्या रामराज्यवियोगाचे पुढील व उत्तररामचरिताच्या पूर्वीचा भाग घेऊन त्यांनीं हें प्रस्तुत नाटक तयार केलें. हें नाटक त्यांनीं आपल्या वडिलांबरोबर नगरास असतांना लिहिलें. हें सर्व त्यांनीं एका महिन्यांत तयार केलें. त्या वेळेस त्यांचें वय अवघें चवदा वर्षांचें होतें.

ह्या नाटकाच्या रचनेविषयीं एक गोष्ट येथें सांगणें इष्ट दिसतें. ती ही कीं, ह्या नाटकांत जें काय आहे, तें सगळें काशीबाईचें आहे. ह्यांत दुसऱ्या कोणाचें कांहींएक नाहीं. त्यांचे वडिलांचा निश्चयच होता कीं, ती सर्व कृति त्यांची स्वतःचीच झाली पाहिजे. ह्मणून जेथें जेथें दोष आढळले, तेथें तेथें सुधारणा करण्याविषयीं मात्र त्यांनीं सुचविलें. त्यांत आपण स्वतःकमजास्त केलें नाहीं, किंवा दुसऱ्या कोणास करूं दिलें नाहीं. हें नाटक काशीबाई जीवंत असतां छापण्याचा योग आला असता, तर तें त्यांनीं याहूनही चांगलें सुधारलें असतें; परंतु, ती गोष्ट देवाला आवडली नाहीं. ह्मणून, आतां त्यांचें स्मारक ह्मणून—ह्मणजे एकाद्या आपल्या प्रिय माणसाच्या मृत्यूनंतर, त्याच्या स्मरणार्थ त्याच्या अंगावरची किंवा त्याच्या हातची वस्तु, जशाच्या तशी ठेवण्याचा पाठ आहे त्याप्रमाणें हें नाटक—त्यांनीं आपल्या हा-

तांनीं जी प्रत लिहून नीट करून ठेविली होती, तिजवरून जशाचें तसें कोठें तिळभरही कमजास्त न करितां, छापविलें आहे. ह्याचें एक मोठें प्रमाण रसिक मर्मज्ञ वाचकांस सहज पटण्यासारखें आहे. तें हें कीं, ह्या नाटकांत कितीएक ठिकाणीं शुद्ध लेखनाचीं आणि छंदोभंगाचीं अशुद्धें दृष्टीस पडतात. पण त्या अशुद्धांवरून ग्रंथकर्त्रीविषयींची आदरबुद्धि तिळमात्रही कमी न होतां, त्यांवरून ती उलट जास्त वाढते. हें त्या अशुद्धांचें माहात्म्य नव्हे, तर तीं ज्या हातांनीं झालीं आहेत, त्यांचें माहात्म्य होय. असो.

काशीबाईचें शिक्षण, आणि त्यांनीं ज्या वयांत हें नाटक लिहिलें तें वय, हीं मनांत आणिलीं ह्मणजे हें नाटक वाचून मोठा चमत्कार वाटतो, आणि आनंद होतो. चमत्कार वाटतो अशाकरितां कीं, एवढ्याशा शिक्षणानें आणि एवढ्याशा वयांत असें नाटक काशीबाईस रचतां तरी आलें कसें. आणि आनंद अशाकरितां वाटतो कीं, आमच्या देशांतल्या बायकांत देखील अद्यापपर्यंत अशा बुद्धीच्या कांहीं मुली निपजतात कीं, त्यांच्या कृति पाहून, विद्याचारसंपन्न राष्ट्रांतल्या चांगल्या सुशिक्षित स्त्रियांसही अचंबा वाटावा. आह्मीं ह्या नाटकाचा बराच भाग खानदेशांत काशीबाईच्या मुखानें ऐकिला होता, आणि आतां तर हें सगळें नाटक लक्षपूर्वक वाचलें. त्यावरून आह्मी असें ह्मणतों कीं, हें नाटक फार चांगलें झालें आहे. ह्यांतले कितीएक प्रसंग तर फारच उत्तम साधले आहेत. ते कोणते आहेत, हें मार्मिक वाचकांस सहज कळण्यासारखें आहे. त्यांवरून नाटकाचा हेतु ह्मय, हें काशीबाईस फार चांगलें समजलें होतें, असें ह्मणण्यास अमुकल हरकत नाहीं.

ह्याप्रमाणें शक्ति ही देवाची देणगी आहे. ती मिळवून मिळत

नाहीं; पण अभ्यासानें वाढते. ती काशीबाईच्या ठायीं बरीच होती, आणि त्यांच्या अल्पायुष्यामध्यें ती बऱ्याच प्रमाणानें वाढलीही होती. तिचीं प्रमाणें अनेक आहेत. त्यांतलीं दोनच येथें सांगतों.

एके वेळीं सहज गोष्टी बोलत असतां, विनोदानेंच, पण थोडी चांचणी पहाण्याकरितां, काशीबाईस त्यांच्या वडिलांनीं ह्मटलें कीं, पाहिजे त्या विषयांवर सांगितल्याबरोबर कविता करितां आली पाहिजे. त्यावर त्यांनीं विचारिलें कीं,ह्या वेळेस कशावर कविता करूं तें सांगा. त्यावरून त्यांनीं जवळ कोपऱ्यांत एक छत्री होती, तिच्यावर कविता करण्यास सांगितलें. तेव्हां काशीबाईनीं पांचदहा मिनिटांतच कविता रचिली, आणि ह्मणून दाखविली ती ही:—

**वानुं किती मी भाग्य इयेचें**
**नृपशिरीं धरिती इजसी साचें ॥ ध्रु० ॥**
**उष्ण दिनांतीं नभ जैसें तें**
**मेघाच्छादित सुखवि जनातें**
**शिरिं धरितां कीं त्यापरि ईतें**
**हरण करि त्या बल तपनाचें ॥ वानुं.**

ह्यांत सुलभ रीतीनें कसा चांगला अलंकार साधला आहे तो पहा.

ह्याप्रमाणेंच,काशीबाई एके वेळीं रा. रा. बाबाजी गणेश देशपांडे, नगरचे सरकारी वकील,ह्यांचे घरीं गेल्या होत्या.देशपांडे ह्यांचा आणि काशीबाईचे वडिलांचा फार परिचय असल्यामुळें त्यांचीही तेथें विशेष ओळख होती. त्या वेळीं, काशीबाईस, जवळ सतार उभी होती, तिजवर एक कविता करावयास देशपांडे ह्यांनीं सांगितलें, ती त्यांनीं तेव्हांच तेथल्या तेथें केली. ती अशी:—

**वानुं किती ह्या गुणसरितेशीं । .ती ॥**
**सौख्यवनींची लतिका जैशी ॥ ध्रु०याची मती॥**

**सुस्वर सुंदर त्या सुमनातें ।**
**राजा रंकही सेवुनि त्यातें ।**
**तोषविती बहु निज चित्तातें ।**
**अभिनव सुंदर लतिका ऐसी ॥ वाजुं.**

ही कविता कोठें लिहिलेली न मिळाल्यामुळें जशाच्या तशी ऐकिंवावरून येथें घातली आहे. हींत शब्दाची द्विरावृत्ती शेवटल्या चरणांत जी आहे, ती दुसऱ्या कोणाकडून चुकून पडली असावी, असें वाटतें. तेवढी खेरीज करून ही कविता पाहिली तर चांगली साधली आहे.

नाटक पूर्ण झाल्यावर एक दोन महिन्यांनीं काशीबाईस ऋतु प्राप्त झाला. आणि पुढें सुमारें दोन महिन्यांनीं त्यांस अपस्मारासारखी कांहीं व्यथा होऊं लागली. त्या संबंधानें सुमारें वर्षभर डाक्तर व वैद्य यांचे उपाय पुष्कळ केले. परंतु, कांहीं उपयोग झाला नाहीं. यामुळें पुढें त्याला कोणी बाहेरची बाधा ह्मणूं लागले, कोणी कांहीं ह्मणूं लागले. परंतु त्याविषयीं त्यांच्या कळवळ्याच्या माणसांची पुढें थोड्याच दिवसांनीं अशी खातरी होऊं लागली कीं, हें सर्व कृत्य एका मोठ्या महापुरुषाचें आहे. असें वाटूं लागण्यास काशीबाईस सन १८८९ सालचे प्रारंभीं पडलेलें एक विलक्षण स्वप्न मुख्यत्वेंकरून कारण झालें. तें स्वप्न असें कीं:–एक घर आहे–कोणतें तें कांहीं आठवत नाहीं–त्या घरांत एक मोठा देव्हारा मांडलेला असून त्याचे पुढें कोणीएक वयोवृद्ध व फार तेजस्वी पुरुष आंगाला भस्म लावून व गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा घालून पूजेला बसलेला आहे. जवळ ह[illegible]ा खांबाशीं एक वयोवृद्ध सुवासिनी स्त्री उभी आहे. ती पांअमुक[illegible] पातळ नेसली आहे, व तिचे आंगांत पांढरीच चोळी ह्याप्रमाणें [illegible] न्हायलेली असून तिनें आपले केश मोकळे सोडिले

आहेत. ती स्त्री त्या पुरुषाची बायको असावी असें वाटत होतें. त्या स्त्रीपुरुषांपैकीं कोणाचेंच तोंड चांगलें दृष्टीस पडलें नाहीं. परंतु, त्यांच्या इतर एकंदर शरीरभागांवरून पाहतां त्यांचे चेहरे फार तेजस्वी असावे. त्या स्त्रीजवळच काशीबाई उभी आहे. व तिनें काशीबाईचा हात धरून त्या पूजेला बसलेल्या पुरुषास विचारिलें कीं, हिचें दुखणें आतां कधीं बरें होणार ? त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, दुखणें बरें कसचें होतें ! ती एक महिन्याची सोबतीण आहे. व आजपासून बरोबर एका महिन्यानें ह्मणजे माघ शुद्ध ९ रोजीं शनिवारीं दिवसा अकरा वाजतां हिचा अंत होईल. तेव्हां ती स्त्री ह्मणाली, "याला कांहीं उपाय नाहीं का ?" त्यानें सांगितलें कीं शंभरांपैकीं नव्व्याण्णव वाटांनीं हें चुकावयाचें नाहीं. मग एका वाटेनें कांहीं झाल्यास सांगवत नाहीं. स्वप्नांतील महापुरुषाच्या दर्शनानें काशीबाईस मोठी धन्यता वाटून आनंद झाला खरा; परंतु, अमुक दिवशीं खास आपला अंत होणार अशी खातरी झाल्यामुळें त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल, ह्याची कल्पना सहज करितां येईल. तथापि केव्हांही त्या महिन्याच्या अवकाशांत बाह्यात्कारीं त्यांचे मनाची शांति नाहींशी झालेली दृष्टोत्पत्तीस आली नाहीं. अशा मनाच्या स्थितींत त्यांनीं आपल्या मातापितरांस उद्देशून कांहीं बोधपर आणि हृदयद्रावक अशा कविता केल्या, व त्या एका कागदावर स्वहस्तें लिहून त्या एका पाकिटांत घालून तें बंद केलेलें पाकिट आपल्या धाकट्या बहिणीजवळ देऊन अमुक दिवसांनंतर तें फोड, ह्मणून तिला सांगितलें. त्या कविता आह्मीं स्वतः पाहिल्या आहेत. त्या येणेप्रमाणें:—

## श्लोक.

**ताता वंद्य तुह्मी ह्मणोनि चरणीं ठेवूनि भाळाप्रती ॥**
**विनवी बालक हें तुह्मासि वडिलां अज्ञान ज्याची मती॥**

उत्पत्ती जगतीं स्थिती लय करी इच्छें प्रभू जो असे ॥
प्रेमें वंदुनि तो उमापति हृदीं काव्यासि वानीतसें ॥

श्लोक.

सदनिं प्रभुकृपेच्या वास सौख्यें आह्मासीं ॥
समजुनि जन गर्वें मानिती ना तयासी ॥
अमर जगति नाहीं जाणुनी सर्व साचें ॥
मम वचनिं असावें लक्ष कीं सार याचें ॥

पद. ( हाचि पिता ) या चालीवर.

ताता शोकाकुल नच व्हावें ॥
मम विनतीतें लक्ष्य असावें ॥ ध्रु० ॥
शाखा सद्गुण बहु विनयाची ॥
पालवि कुसुमें तीं शांतीचीं ॥
आदर छाया मुळें दयेचीं ॥
लोकप्रियता श्रीच ह्मणावें ॥ ताता. ॥ १ ॥
पेशा तरुच्या या तुलनेसी ॥
योग्य तुह्मी प्रिय जनक आह्मासी ॥
उदरीं फळ तव मीच तयासी ॥
भाग्य किती मम हेंचि पहावें ॥ ताता. ॥ २ ॥
कलंक कसला नच या तनुला ॥
पात्र असे ही ईशपदाला ॥
ह्मणुनी शोक न इष्ट तुह्मांला ॥
सुज्ञ तुह्मी मी काय वदावें ॥ ताता. ॥ ३ ॥

अंजनी गीत.

शोकानल तो मम मातेचें ॥
दग्ध करिल वन तनुलतिकेचें ॥
कोमल अंतर स्त्रीजातीचें ॥
अज्ञानीं भरतें ॥ १ ॥

तव मुख घन तो होउनि त्यासीं ॥
बोधरूपि त्या जलधारेसी ॥
वर्षुनि सत्वर या समयासी ॥
शीतल तो व्हावा ॥ २ ॥

पद ( हाचि पिता ) या चालीवर.

ठेवुनि तुमच्या पदिं शिर माते ॥
जोडुनि कर ही विनवि तुह्मांतें ॥ ध्रु० ॥
ईशकृपेची अभिनव लीला ॥
भाग्योदय गे माझा झाला ॥
सौभाग्यासह या समयाला ॥
पाहिन नयनीं प्रभुचरणातें ॥ १ ॥
आचरिती तप बहु जरि साचें ॥
तरिही दुर्मिळ असति जयाचे ॥
ऐशा कोमल पदकमलींचें ॥
भ्रमरचि हें मन त्यावरि होतें ॥ २ ॥

पद ( वस्त्रानें देह सारा० ) या चालीवर.

सुखदचि ती प्रभुची कीं रचना ही योग्यसी ॥
असुनीयां व्यर्थ कां गे शोकातें मानिसी ॥
मत्प्राणाहूनि माझ्या प्रिय भगिनी मजप्रती ॥
त्यागीं तूं विरह माते मज सम त्या असती ॥ १ ॥

पद ( चाल सदर )

अमरचि गे कोण झाला सांगें या भूवरीं ॥
गति ऐसी मृत्युलोकीं होते ती यापरी ॥
शोकाच्या व्यर्थ कां त्या तिमिरातें पसरिसी ॥
ज्ञानाच्या तपनातें हृदयीं कां लपविसी ॥ १ ॥

ह्या पद्यांत कवित्व किती तरी आहे ह्मणून सांगावें ? ह्यावरून त्यांच्या मनाची समता, शांति व उन्नति ह्या सहज लक्ष्यांत येतात,

व ईश्वरचरणीं त्यांची किती भक्ति होती, व परमार्थाकडे त्यांच्या मनाचा ओढा किती होता, हें स्पष्टपणें समजतें.

स्वप्नांत सांगितलेलें मोटें अरिष्ट मोठ्या दैविक रीतीनें टळलें, व त्या वृद्ध व तेजस्वी महापुरुषाचें काशीबाईस त्या दिवशीं पुन्हा दर्शन झालें. आणि त्या दिवसापासून त्याच्या ठायीं काशीबाईची विलक्षण श्रद्धा बसून त्यास त्या आपला देवच मानूं लागल्या. इतकेंच नाहीं, परंतु ऐहिकसंबंधीं सर्व वडीलपणाचीं नातीं त्यांनीं त्यांचे ठिकाणीं स्थापित करून त्यांस त्या लडिवाळपणानें 'अण्णा' या नांवानें हाक मारीत असत. स्वप्नांतील अरिष्ट टळल्यादिवसापासून पुढें काशीबाईचा अंत होईपर्यंत त्या महापुरुषाच्या अगाध लीलेचे व कृपेचे त्यांना व त्यांच्या दुसऱ्या माणसांना अनेक चमत्कारिक व अलौकिक अनुभव आलेले आहेत, व त्या सात वर्षांच्या हकीकतीचें तारीखवार टिपण केलेलें त्यांच्या वडिलांजवळ आहे. तें प्रसिद्धीस आणण्याचा त्यांचा विचार आहे किंवा नाहीं, तें मला माहीत नाहीं.

असो. तर त्या अपस्माराच्या विकारानें ह्मणा किंवा कशानेंही ह्मणा, त्यांस पुढें सात वर्षेंपर्यंत शारीरिक यातना सारख्या भोगाव्या लागल्या. दिवसानुदिवस त्या फार क्षीण होत जाऊन शेवटीं दोन तीन वर्षें तर अगदीं परस्वाधीन होऊन आंथरुणाला खिळल्यासारख्याच झाल्या होत्या. अशा क्षीणावस्थेंत त्यांना पांच मुलें झालीं. त्यांतला एक तीन वर्षांचा मुलगा मात्र हल्लीं कायम आहे. प्रत्येक गरोदरपणीं व बाळंतपणाचे वेळीं त्यांचे फार हाल झाले. सारांश, आपल्या अल्पायुष्याचीं शेवटलीं पांचसहा वर्षें त्यांनीं पराकाष्ठेच्या हालांत व दुःखांत काढिलीं. परंतु चमत्कार असा कीं, त्याविषयीं तिरस्कार किंवा जि-

वाचा कंटाळा ह्याविषयीं त्यांच्या मुखावाटे एक अक्षर देखील निघालें नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर अतिशयित कष्ट होऊं लागले ह्मणजे त्यांनीं एखाद्या साधूप्रमाणें शांतपणें ह्मणावें कीं, "देवा, हे कष्ट सोसण्यास मला सामर्थ्य दे." ह्या वृत्तीची पूर्णता एकदां आश्विनमासीं नवरात्रांत त्या फार आजारी असतां दृश्यमान झाली. त्यांच्या मनांत असें आलें कीं, आपण देवीची पूजा करावी, व त्या वेळेस स्वकृत पद्यें ह्मणावीं. त्याप्रमाणें लागलींच दोन तासांत दोन पद्यें त्यांनीं रचिलीं, आणि तीं चांगल्या गळ्यावर ह्मणून त्यांनीं देवीची पूजा केली.

तीं पद्यें हीं आहेत:—

*पद. (रणधीरा श्रीवर वरद.) या चालीवर.

**नमितों तुज सकल मिळुनि हररमणी ॥ मुदित मनीं सतत ॥ नमितों ॥ ध्रु० ॥ आदिजननी, अघहरणी, शुभकरिणी, करविरवासीनी ॥ हरिभगिनी, पर्णाशनी, घोरवनीं, तप करुनी ॥ अर्चुनि, प्रार्थुनि, मोहिला शंभु तुवां, हिमनगप्रियनंदीनी ॥ ता, री, तूं, हे पतित अनुदिनीं शरण चरणिं ॥ नमितों ॥ १ ॥**

पद. (भैरवी.)

**झालों धन्य जगीं या मातें ॥ ध्रु० ॥**
**तव चरणाचें दर्शन सेवन ।**
**निशिदिनिं पावन करि देहातें ॥ धन्य० ॥**
**अनंत जन्मीं बहु तप केलें ।**
**उदया आलें आजि सारें तें ॥ धन्य० ॥**

त्याचप्रमाणें एके प्रसंगीं ही दोन पद्यें करून त्यांनीं शिवस्तुति केली होती:—

---

* हें पद हें नाटक रंगभूमीवर करितांना शेवटीं ह्मणण्यास उपयोगीं पडेल.

### पद.

( राग पिलु. चाल–सदाशिव धुंदी. )

**लीन तुझ्या चरणीं ॥ भक्तप्रिया मन होवो निशि-दिनीं ॥ ध्रु० ॥ भस्मविभूषित धवल तनूवर । नीलकंठ तो शोभे मनोहर । भाळीं चंद्र शिरिं गंगा सुंदर । मग्न सदा जो राघवध्यानीं ॥ लीन० ॥ १ ॥ विश्वजननि ती वामांकासी । ब्रह्मादिक सुर स्तविति जियेसी । मूर्ति वसो मम हृदयीं ऐसी । विनति असे ही जोडुनि पाणी ॥ लीन० ॥ २ ॥**

पद ( चाल–कृतांत पुरुषा असा. )

**जय भवहरणचिद्घना ॥**
**प्रार्थितें तुजसि नागभूषणा ॥ ध्रु० ॥**
**अप्रमेय तव चरितोदधीसी ॥**
**तरण्या नौका तूंच आह्मासी ॥**
**शक्ति नसे बा ती मनुजासी ॥**
**रक्षीं करुणाघना ॥ प्रार्थितें ॥ १ ॥**
**शरण तुझ्या मी पदकमलासी ॥**
**दूर करीं या तापत्रयासी ॥**
**दुर्मिळ जे बहु सुरासुरांसी ॥**
**दाखविं त्या चरणां ॥ प्रार्थिते ॥ २ ॥**

हीं पद्यें पाहिलीं ह्मणजे शारीरिक यातना रात्रंदिवस होत असतांनाही काशीबाईंच्या मनांत शांति कशी वसत होती, व त्यांची भक्ति ईश्वराचे ठायीं किती होती, हें चांगलें व्यक्त होतें.

असो. अशा प्रकारें इहलोकची यात्रा करून बाळंतपणाच्या पांचव्या खेपेस, आठव्या दिवशीं–ह्मणजे आषाढ शुद्ध १३ शके १८१८ ह्या दिवशीं–सौ० काशीबाईंनीं शांतपणें इहलोक सोडून स्वर्गलोकीं गमन केलें ! तेव्हां त्यांच्या मातापितरांस आणि इतर

संबंधी माणसांस अतोनात दुःख झालें. त्यांचें सांत्वन करण्यास किंवा दुःखास जरासें विरजण घालण्यास काशीबाईंचा एक तीन वर्षांचा मुलगा आहे, आणि हें नाटक आहे. चिरंजीव शतायु होऊन आपल्या मातुश्रीच्या बुद्धिमत्तेचें आणि दृढभक्तीचें उत्तम प्रदर्शन करो; आणि हें नाटक आमच्या होतकरू स्त्रीजनांच्या करमणुकीस आणि सदुपदेशास निरंतर साधन होवो, असें परमेश्वरापाशीं मागून, आह्मी हें अल्पचरित्र येथें समाप्त करितों.

मुंबई, } विनायक कोंडदेव ओक.
मे १८९७.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

श्रीरामचंद्र प्रसन्न.

# संगीत सीताशुद्धि नाटक.

## अंक पहिला.

### नांदी.

पद–( वंदन त्या ईशा ) ह्या चालीवर.

शंकर गिरिजारमणा । प्रथम वंदितें मी तव चरणा ॥ ध्रु० ॥ विघ्नविनाशक मग मी नमितें ॥ कविवर वाल्मिकि त्यातें स्तवितें ॥ कविनें कथिलें रामचरित तें । बलवत्कन्या नाटकिं रचितें ॥ होवो प्रिय तें महाजनां ॥ १ ॥ शंकर ॥

पद–( अवन करो तुमचें ) ह्या चालीवर.

सतत तुह्मां सकलां । गिरिजापति तो सुखकर होवो ॥ ध्रु० ॥ हालाहल जें प्राशन करुनी । त्रैलोक्यातें बहु सुखवोनी । कंठीं धरितां झालें । भूषण सज्जनमानसिं राहो ॥ १ ॥ तापद होतां जान्हवी धरिली । शिरिं इंदुहि परि शांति न झाली ॥ ध्यातां राघव झाला । शीतल आत्मा दुरिता पळवो ॥ २ ॥ स० ॥

( सूत्रधार प्रवेश करितो. )

**सूत्रधार**—पुरे पुरे. सभासदांच्या उत्कंठेला अनुसरून वर्तन केलें पाहिजे. आतां सभासदांस हात जोडून माझी अशी विनंति आहे कीं—

### साकी.

बहु काव्यांची रचना केली योग्य अशा कविवरिं ती ॥
रसिक त्याहुनी दावितसें मी बलवत्कन्या सुकृती ॥
टाकुनि दोषांतें । सेवा नूतन रचनेतें ॥ १ ॥

( पडद्याकडे पाहून. )

प्रिये जरा इकडे यें पाहूं. ( नटी येते. )

**नटी**—प्राणनाथ, ही आलें, काय आज्ञा आहे ?

**सूत्रधार**—सखे, ऐक—

### साकी.

सकलकलानिपुण जे पंडित आजि सभेमधिं पाहें ॥
तोषविण्यास्तव त्यांतें योग्य हि सीताशुद्धी आहे ॥
योजुनि पात्रांतें ॥ आणीं रंगस्थलिं कांते ॥ १ ॥

**नटी**—प्राणनाथ—

### कामदा.

खेळ चांगला योजिला असे ॥
हृदयिं मम बहू तोष देतसे ॥
थोर तूमची कुशलता खरी ॥
पाहुनी सभा नवल हें करी ॥ १ ॥

**सूत्रधार**–प्रिये, असें जरी आहे तरी त्यांतील तुला वर्म सांगतों—

### दिंडी.

जरी होइल संतोष पंडितांना ॥
खेळ पाहुनि ऐकूनि तशा गाना ॥
परी शंकित चित्त तें फार होतें ॥
सांगतों हा नियम मी तुला कांते ॥ १ ॥

**नटी**–बरें, पण पुढें काय करावयाचें त्याची आज्ञा व्हावी.

**सूत्रधार**–प्रिये, या वसंतऋतूचें वर्णन करून गायन कर, नंतर नाटकास आरंभ करूं.

**नटी**–ठीक आहे.

**पद** ( वैशाख मास ) ह्या चालीवर.

हा वासंतिकसमय जनां सुखद वाटला । मंद शीत गंधयुक्त वात सूटला ॥ ध्रु० ॥ जाइ जुई मोगरि ही धवल शेवती । आम्रवृक्ष पारिजात वकुल मालती । उपवनिं हे कुसुमित तरु बहुत शोभती । गंधपुष्पपरिमल हा बहुत सूटला ॥ १ ॥ वृक्षावरि सकल पक्षिवृंद बैसती । निजस्त्रीसह मंजुल ते शब्द बोलती । राजहंस चक्रवाक मयुर नाचती । शीत किरण पसरित हा चंद्र उगवला ॥ २ ॥ सौधावरि चंद्रप्रभे माजि कामिनी । विमलशीत वासित तें उदक शिंपुनी । आनंदें बैसति त्या पतिस घेउनी ॥ अवचित तो पंचबाण उदय पावला ॥ ३ ॥

**सूत्रधार**—अहाहा! प्रिये, फार उत्तम गायन केलेंस.

**साकी.**

**मधुर तुझें हें गायन ऐकुनि मन वेडावुनि गेलें ॥**
**सीतेच्छा ती पूर्ण कराया राम काननीं आले ॥**
**हरिणामागें ते ॥ जाऊं सत्वर गृहिं कांते ॥ १ ॥**

(सूत्रधार व नटी जातात.)

ही प्रस्तावना झाली.

(तदनंतर हरिणामागें लागलेला रामचंद्र प्रवेश करितो.)

**राम**—या हरिणानें मला आश्रमापासून वरेंच दूर आणिलें.

**पद**—(काय वेड्या) या चालीवर.

**सुवर्णप्रभ अति सुंदर मृग हा फारचि सुखवीतो ॥ ॥ मनाला ॥ पवनगती परि पळतां मागें मुरडुनि किति बघतो ॥ कसा हा ॥ बाणभयें तो धांवत वाटे भूमिस नच शिवतो ॥ मुळीं हा ॥ मजला वाटे सन्निध परि हा सत्वर दुर जातो ॥ किती हा ॥ १ ॥**

अहाहा!

**ठुंबरी** (लाजवील ही सुरयुवतीशीं) ह्या चालीवर.

**सुंदर कांती पाहुनि याची ॥**
**भुलली चित्तीं प्रियसखि साची ॥ ध्रु० ॥**
**दुर्मिळ हा जो बघण्या लोकीं ॥**
**लाभ ती याचा इच्छितसे कीं ॥**

फिरतां या जनस्थानीं हा कीं ॥
पसरली शोभा रम्य जयाची ॥ १ ॥

आतां याचा वध करितों ( बाणाचा नेम धरून )

**साकी.**

सोडुनि बाणा मारुनि यातें साधिन मी कार्यासी ॥
पूर्ण करिन तो हेतु प्रियेचा नेउनि हा तिजपाशीं ॥

( असें ह्मणून निघून जातो. )

( लक्ष्मणासह सीता प्रवेश करिते. )

**सीता**—

**पद**–( आले वनमाळि रात्रीं ) ह्या चालीवर.

हेमकांति रम्य असा हरिण नयनिं पाहुनी ॥ व्हावा तल्लाभ मजसि वाटतसे ऐसें मनीं ॥ प्राणेश्वर गेले असति सज्जचाप घेउनी ॥ होइल मम पूर्ण खचित हेतु आतां याच क्षणीं ॥ १ ॥

**लक्ष्मण**–वहिनी, हें आसन घातलें आहे यावर बसावें.

**सीता**–तुह्मींही बसावें. भावोजी, प्राणनाथांस जाऊन बराच वेळ झाला. अजून ते कां बरें येत नाहींत !

**लक्ष्मण**–वहिनी, रामचंद्र लवकरच परत येतील, काळजी करण्याचें कारण नाहीं.

( इतक्यांत पडद्यांत लक्ष्मणा धांव असा शब्द होतो.)

**सीता**–भावोजी, हा प्राणनाथांचा शब्द आहे असें मला वाटतें. तर उठा, लवकर धांवा, वनामध्यें प्राणनाथांला

राक्षसांनीं पीडा दिली असेल ह्मणून त्यांस साह्य करावयास जा.

**लक्ष्मण**—वहिनी, हा कांहीं रामचंद्राचा शब्द नाहीं. ही कांहीं तरी राक्षसी माया आहे.

**सीता**—भावोजी, माझ्या जिवाला समाधान वाटत नाहीं, तर कांहीं तरी प्राणनाथांस संकट उत्पन्न झालें आहे; तेव्हां लवकर जा.

**लक्ष्मण**—वहिनी,

**पद** ( थाटमाट सदनिं नवा ) ह्या चालीवर.

**वनिं असे रामराय एकटा जरी ॥ शक्त त्यासि जिंकण्यास नाहिं भूवरी ॥ ध्रु० ॥ शूर धीर रामराय एक तो असे ॥ तत्सम जगिं अन्य वली कोणि गे नसे ॥ क्षत्रांतक भार्गवही लोपला असे ॥ सारें हें कपट खचित जाण सुंदरी ॥ १ ॥**

**सीता**—( क्रोधानें ) निर्दया, तुझ्या मनांतला भाव मी समजलें, प्राणनाथांला वनांत राक्षसांनीं वधावें आणि मग मला आपली पत्नी करावी असा तुझा भाव आहे. याकरितांच तुला कैकेयीनें पाठविलें वाटतें.

**पद**—कानडी चालीवर.

**निष्ठुर किति तरी अससी ॥ कपटी असें कां वर्तन करिसी ॥ ध्रु० ॥ संकटीं पाहुनी निजबंधूला। विपरीत कैसें चित्तीं आणिसी ॥ कंठ जरी या समयीं चिरिला ॥ परि नच होइन वश मी तुजसी ॥१॥**

**लक्ष्मण**—हरहर! काय बोलतेस हें! धिक्कार असो तुला! मी निष्कपटपणानें बोललों कीं रामचंद्र सदा विजयी आहे, तें तुला वाईट लागलें. असो; त्याचीं फळें तूं भोगशील. हे वनदेवतांनो, हिचें रक्षण तुह्मी करा. (असें ह्मणून दुःखानें जातो.)

(इतक्यांत यतिवेष धारण केलेला रावण प्रवेश करितो.)

**रावण**—हा जनस्थानाचा प्रदेश व गोदावरीचा प्रवाह किती सुंदर आहे! व त्यामुळें हें सारें तपोवन किती रमणीय दिसत आहे!

**पद**—लावणीचे चालीवर.

**किति सुंदर हें उपवन शोभे सुखवी माझ्या नयनांसी ॥ गोदावरिचा प्रवाह सुंदर दिसतो रमणिय किति मजसी ॥ पक्षि मधुर बहू ध्वनि हा करिती कोकिल मंजुल किति गाती ॥ वाटे सुखकर प्रांत किती हा क्रीडति त्यामधिं हरिण किती ॥ १ ॥**

सारें खरें, मीं शूर्पणखेच्या सांगण्यावरून रामचंद्राची स्त्री हरण करण्याकरितां मारीच राक्षसाला मायावी मृगवेष धारण करवून पाठविलें होतें. त्यानें रामलक्ष्मणांस मोहित करून खचित दूर नेलें असावें. आतां ही वेळ सीतेला हरण करण्यास चांगली आहे. ( इकडे तिकडे फिरून ) ही पहा सीता आश्रमांत एकटी बसली आहे, अहाहा! हिचें रूप किती सुंदर आहे!

**पद**–( मज लावण्याची खनि दिसते ) ह्या चालीवर.

**किति सुंदर तरि तनु दिसते ॥ ध्रु० ॥ केवळ कमला दुसरी वाटे ॥ रत्नचि ऐसें दुसरें कोठें ॥ दिसे ना नयनांतें ॥ किति ॥ १ ॥**

आतां तिच्या सन्मुख जावें. ( असें ह्मणून पुढें जातो. )

**सीता**–( उठून ) यतिमहाराज, हें आसन घातलेलें आहे ह्यावर बसावें. ( आसन घालते, रावण आसनावर बसतो. )

( सीता नमस्कार करिते व तो आशीर्वाद देतो. )

**सीता**–यतिराज, आपण किंचित् बसावें, आतां रामचंद्र घरीं आले ह्मणजे आपला चांगला सत्कार करितील.

**रावण**–बाई, तुह्मी कोण व अशा घोर अरण्यांत येण्याचें कारण काय ?

**सीता**–यतिराज, अयोध्येचा राजा दशरथ त्यांचे चार पुत्र आहेत. त्यांतील ज्येष्ठ पुत्राचें नांव रामचंद्र व त्यांच्या कनिष्ठ बंधूचें नांव लक्ष्मण आहे. त्या रामचंद्रांची मी पत्नी आहें. माझें नांव सीता. रामलक्ष्मण आपल्या पित्याच्या आज्ञेवरून दंडकारण्यांत वास करण्याकरितां आले आहेत. यतिमहाराज, आपण कोण व कोठें वास करितां ?

**रावण**–बाई, मी या अरण्यांतच वास करितों.

**सीता**–असें काय ? बरें तर. इतक्यांत रामचंद्र फळें घेऊन येतील, तोंपर्यंत आपण बसावें.

**रावण**—बाई, मला बसावयास अवकाश नाहीं.

**सीता**—बरें तर आपणांस भिक्षा घालितें.

( सीता भिक्षा घालिते इतक्यांत रावण तिचा हात धरितो. )

**सीता**—( क्रोधानें त्याचा हात झिटकारून ) अधमा, चांडाळा, तूं कोण आहेस तें बोल.

**रावण**—सीते, मी लंकेचा राजा रावण आहें, तुला हरण करण्याकरितां येथें आलों आहें.

**सीता**—हाय हाय, हे प्राणप्रिया.

**पद**—( बलसागर तुह्मी वीर शिरोमणी )ह्या चालीवर.

**सोडुनि वनीं या मजसीं कैसें प्राणप्रिया गेला ॥ दुष्ट राक्षसापासुनि आतां रक्षावें मजला ॥ सुवर्ण-प्रभ तो पाहुनि मृग मीं भुललें कीं अवला ॥ पूर्ण कराया हेतू माझा वनिं आपण गेलां ॥ दुष्ट राक्षसें संधि साधिली हरण्याला मजला ॥ घोर वनीं या साहूं कैसें अपुल्या विरहाला ॥ १ ॥**

हाय हाय! हे वत्सा लक्ष्मणा, मी तुझ्या वचनाचा अव्हेर केला, ह्मणून मला ही दशा प्राप्त झाली. आणखी मीं तुजला दुरुत्तरानें ताडण केलें त्याची मला क्षमा कर. हे प्राणप्रिया.

**पद**—( मना तळमळसी ) ह्या चालीवर.

**हतभागी ठरली, खचित ही हतभागी ठरली ॥ कपटरूप या काळें हरिली, चरण अंतरली ॥ध्रु०॥ मृगतनुकंचुकीसाठिं कोमल, मूर्ति तुझी श्रमविली**

॥ १ ॥ भक्तशिरोमणी सौमित्रातें, दुष्ट वचन हीं वदली ॥ २ ॥ तव विरहाच्या सागरिं आतां, दुर्दैवें ही बुडाली ॥ ३ ॥ काळमुखांतुनी काढिल ऐशी, त्वत्पादिं आशा धरिली ॥ ४ ॥

आतां तुला कोठें पाहूं.

**रावण**—सीते, तूं व्यर्थ शोक कां करितेस. माझ्यासारख्या सार्वभौम राजाला सोडून त्या भिकारड्या रामाला घेऊन काय करितेस.

**सीता**—नीचा, काय बोलतोस हें ?

**रावण**—हा पहा तुला मी घेऊन जातों. आतां राम तुझें कसें रक्षण करितो तें पाहतों. ( असें ह्मणून सीतेला घेऊन जातो. )

( राम प्रवेश करितो. )

**राम**—हा मृग मारिला आहे, आतां ह्याला सीतेपाशीं घेऊन जावें. ( कोणी येत आहेसें पाहून ) अरे हा कोण येत आहे बरें ? हा तर लक्ष्मण येत आहे. हा सीतेस टाकून कसा आला ?

( लक्ष्मण प्रवेश करून )

**लक्ष्मण**—हे रामचंद्र इकडेच येत आहेत. अहाहा !

**पद**—( झाली सफळही ) ह्या चालीवर.

चाप करीं तें तनु शोभत कैसी ॥ ध्रु० ॥ हेमकांति मृग वनीं वधूनी । विश्रम घेत हा तरुछायेसी ॥ १ ॥ सीतेला मी त्यजिलें ह्मणूनी । दोष आतां तो देइल मजसीं ॥ २ ॥

**राम**—( जवळ येऊन ) लक्ष्मणा, तूं सीतेला टाकून कां आलास ?

**लक्ष्मण**—आर्या, सीता देवी आणि मी आश्रमांत असतांना कोणी राक्षसानें लक्ष्मणा धांव, अशी हाक मारिली. त्या वेळीं आपण हाक मारिली असें सीतेला वाटून तिनें मला आपल्याकडे जाण्यास आज्ञा केली. तेव्हां मीं तिला पुष्कळ प्रकारांनीं बोध केला, पण तिला तें खरें न वाटून ती—

## दिंडी.

**दुष्ट ऐसा ऐकूनि शब्द मातें ॥**
**साह्य जा मग बोलली दुःखितातें ॥**
**बहुत तेव्हां मीं बोधिलें तियेला ॥**
**वचनबाणें गांजिलें मम मनाला ॥ १ ॥**

तें माझ्यानें ऐकवेना ह्मणून मी निघून आलों.

**राम**—लक्ष्मणा, ती बोलली ह्मणून तिच्यावर कोप करून निघून आलास, हें तूं चांगलें केलें नाहींस. आतां तिला राक्षसांनीं नेलें किंवा क्रूर पशूंनीं खाल्लें तर कसें होईल.

**पद्**—( काय वधिन मी ती सुमती ) ह्या चालीवर.

**काय करिल माझी सखि ती ॥ मजविण त्या भुवनीं पंचप्राण ते केवि धरिल सुंदरि आतां ती ॥ध्रु०॥ अबला वचनीं रोष धरूनी ॥ कैसी त्यजिली निर्जनस्थानीं एकटी युवती ॥ १ ॥ दुष्ट राक्षसें नेतां धरूनी ॥ भेटेल कैसी मज ती रमणी ॥ पुनरपी ती ॥ २ ॥**

हे प्राणसखे सीते, तुझी काय दशा झाली असेल?

**पद**–( राग कानडा ).

**शशिवदने तव गति गे कैसी ॥ होईल आतां न कळे मजसीं ॥ ध्रु० ॥ तव इच्छित तें पूर्ण कराया ॥ वधिला सुंदरि मृग या ठायां ॥ १ ॥ परि तें वाटे गेलें वायां ॥ काय करूं या हतदैवासी ॥ २ ॥**

**लक्ष्मण**–हे आर्या, येथें शोक करून विलंब करण्यांत उपयोग काय?

**साकी.**

**पंचवटीमधिं जाउनि आतां भेटुनि सीतासतितें ।
सुखवावें कीं मानस तीचें अर्पुनि या हरिणातें ॥१॥**

**राम**–बरें आहे, चल जाऊं.

( राम लक्ष्मण निघून जातात. )

**पहिला अंक समाप्त.**

---

## अंक दुसरा.

( राम लक्ष्मण प्रवेश करितात. )

**राम**–लक्ष्मणा, सीतेला राक्षसांनीं नेलें असावें. कारण पंचवटीच्या आसमंतात् आपण तिचा पुष्कळ शोध केला, परंतु ती कोठें सांपडत नाहीं. अहाहा! प्राणप्रिये सीते, तुला कोठें पाहूं.

**पद**–( हरिणाक्षी प्रिया ) ह्या चालीवर.

**हरिणाक्षी मम प्राणप्रिया जनकात्मजा सखि सुंदरी ॥ किंचित् होतें भाग्य ह्मणूनी प्राप्त झालि ती सुकुमारी ॥ ध्रु० ॥ सार्वभौम ते टाकुनि राजे सुंदरिनें मजला वरिलें ॥ मजवरिच्या त्या प्रेमालागीं नाहिं कधीं अंतर पडलें ॥ दैवगती कशि विचित्र झाली दुष्ट राक्षसें तिस नेलें ॥ प्रेम असूनी मजवरि सारें सखिनें आतां मज त्यजिलें ॥ सोसेना तो विरह सखीचा जाळितसे मज अंतरीं ॥ १ ॥**

अहो वृक्षांनो, तुह्मी माझ्या प्रियेचा मार्ग मला सांगा.

**पद**–( दिसली मुनिकन्या ) ह्या चालीवर.

**पुसतों तरुवर हो तुह्मां सकलां ॥ पाहिलि कां त्या सुंदरिला ॥ ध्रु० ॥ सुखवी चंद्रापरि जी नयनाला ॥ रूपें लाजवि जी कमला ॥ कवण्या दुष्टें ती कोमल बाला ॥ हरुनीयां घातचि केला ॥ कवण्या स्थलिं तो गुप्तचि झाला ॥ दावा तो मार्ग किं मजला ॥ १ ॥**

अरे, हे कांहींच बोलत नाहींत. तेव्हां ह्यांना माझ्या प्रियेचा मार्ग ठाऊक नाहीं. आतां हा हंस पुढें येत आहे, ह्याला विचारून पाहूं. हे हंसा,

**पद**–( लक्ष्मीसम चंचल ) ह्या चालीवर.

**हंसा हे जोडुनि कर प्रार्थितों तुला ॥ भेटविं तूं स-**

त्वर मम प्राणसखीला ॥ ध्रु० ॥ गौरवर्ण कांति किती । झळकतसे दंतपंक्ति ॥ कमलापरि नेत्र दिसति । सहज मृगा लाजवीति ॥ मोहक ती रम्य मूर्ति । वेधुनि मम चित्त नेति ॥ कवणें ती रमणि हरिलि सांग तूं मला ॥ १ ॥

अरे, हा सुद्धां कांहीं बोलत नाहीं. तो पहा चक्रवाक पक्षी आपल्या स्त्रीबरोबर क्रीडा करीत आहे. हे चक्रवाका,

## दिंडी.

प्रियाविरहित पाहूनि मला ऐसें ॥
चक्रवाका करिसि हें कर्म कैसें ॥
लाज नाहीं मानसीं तुझ्या कैसी ॥
महानंदें क्रीडसी स्त्रियेपाशीं ॥ १ ॥

सौमित्रा, ही पाहिली कां कोकिला आम्रवृक्षावर बसून गायन करीत आहे. हिला विचारून बघूं. बाई कोकिले,

## साकी.

कामिजनांच्या मनोरंजनीं चतुरचि तूंगे असती ॥
तरी सदय तूं होउनि आतां भेटविं प्राणसखीसी ॥
विनवीतों तुजला । ऐकें माझ्या वचनाला ॥ १ ॥

**लक्ष्मण**—हे आर्या, हा पहा राक्षस कसा स्वस्थ निजला आहे. मला वाटतें यानेंच सीता देवीला भक्षिलें असावें.

**राम**—खरें यानेंच तिला खाल्ली. पहा, याचा आतां वध

करितों. ( जवळ जाऊन ) काय! हा तर माझें स्मरण करित आहे. हा कोण असावा बरें? अरे, माझें स्मरण करणारा असा तूं कोण आहेस, सांग.

**जटायु**—रामचंद्रा, मी जटायु पक्षी आहें. तुझी स्त्री रावण हरण करून नेत असतां मी त्याला वाटेंत प्रतिबंध करून त्याच्याशीं युद्ध केलें, व त्याचा रथ, अश्व व सारथी ह्यांचा नाश केला; परंतु त्यानें माझे पक्ष उपटिले, त्यामुळें मी हतवीर्य होऊन खालीं पडलों. नंतर तो सीतेला घेऊन निघून गेला. आतां माझ्याच्यानें बोलवत नाहीं. माझे प्राण जाण्याचा समय प्राप्त झाला. मरणसमयीं आपलें दर्शन झाल्यानें मी कृतकृत्य झालों. ( राम, राम, राम, असें ह्मणून प्राणत्याग करितो. )

**राम**—हर हर! जटायूस माझ्याकरितां मरण आलें काय? सौमित्रा, काष्ठें आणून चिता रचून जटायूचें दहन कर.

**लक्ष्मण**—आज्ञेप्रमाणें करितों ( असें ह्मणून जटायूचें प्रेत दहन करण्यास घेऊन जातो. )

**राम**—हरहर जटायो—

### दिंडी.

मित्रकार्यीं धाउनि युद्ध केलें ॥
रावणें तव पक्ष ते छेदियेले ॥
पावलासी निधन तूं ह्मणुनि आतां ॥
दशरथासम मानितों तुला ताता ॥ १ ॥

( लक्ष्मण प्रवेश करितो. )

**लक्ष्मण**–हे आर्या, आपल्या आज्ञेप्रमाणें जटायूचें दहन केलें. आतां आपण ऋष्यमूकपर्वताच्या आसमंतात्-भागीं सीतादेवीच्या शोधार्थ जाऊं.

**राम**–ठीक आहे चला. ( असें ह्मणून जातात. )

( तदनंतर ऋष्यमूकपर्वतावर वसलेला सुग्रीव सचिवासह प्रवेश करितो. )

**सुग्रीव**–हनुमंता, आकाशमार्गानें जात असतां जिनें आपल्या वस्त्रांत अलंकार बांधून खालीं टाकिले, ती स्त्री कोण असावी बरें?

**हनुमान**–राजन्, ती स्त्री कोणी राजपत्नी असावी, असें तिच्या सौंदर्यावरून वाटतें.

**सुग्रीव**–परंतु तो तिला हरण करणारा कोण असावा बरें?

**नल**–तो कोणी मायावी राक्षस असावा असें वाटतें; आणखी ती जात असतांना ती आपल्या मुखकमलानें राम राम या शब्दाचा उच्चार करून विलाप करीत होती.

**सुग्रीव**–हनुमंता, ते दुरून कोण येत आहेत. त्यांचें वय वीस वर्षांचें असून शरीराची कांति सूर्यप्रभेहूनही अधिक आहे, जटा बांधिल्या असून वल्कलें परिधान केलीं आहेत, ते कोण असावे बरें? मला वाटतें कीं वालीनें माझा वध करण्याकरितां ह्यांस पाठविलें असावें; तर तूं जाऊन ते कोण व ते इकडे कशाकरितां येत आहेत, याचा शोध करून ये.

**हनुमान**–बरें आहे. ( असें ह्मणून निघून जातो. )

( रामलक्ष्मण प्रवेश करितात. )

**राम**–लक्ष्मणा, त्या कबंधाच्या कवेंत सांपडलों होतों, त्या वेळेस मेलों असतों तर फार चांगलें झालें असतें. कारण हें विरहदुःख भोगावें लागलें नसतें. हे प्राणप्रिये सीते ! लक्ष्मणा तिची गति काय झाली असेल !

**पद**–( परणिलें न मुनिकन्येला ) ह्या चालीवर.

**प्राणप्रिया मम सुंदरि ती ॥ दिधली राक्षसा हातीं ॥ जिवलगा ॥ जनकसुता सुकुमारी ती ॥ सोशिल कशि या विरहा ती ॥ जिवलगा ॥ मजवांचुन एक क्षण ती ॥ नच राहे मंदिरिं कधिं ती ॥ जिवलगा ॥ सुंदरी ॥ दुःखि अंतरीं ॥ होउनी जरी ॥ त्यजिल प्राणाला ती ॥ भेटेल नच पुनरपि मज ती ॥ १ ॥ जिवलगा ॥**

हे प्राणप्रिये सीते, तुझी गति काय झाली! कधीं एक क्षणभर मजवांचून मंदिरीं सुद्धां राहिली नाहींस. आणखी आतां कसा माझा कंटाळा आला ! सखे, मी केलेल्या अपराधाची क्षमा करून मला लवकर भेट दे. माझा प्राण तुजवांचून व्याकुळ झाला आहे. लक्ष्मणा, मला वांचीव रे वांचीव. ( असें ह्मणून मूर्छा पावतो ).

**लक्ष्मण**–हाय हाय! प्रभूला तर मूर्छा प्राप्त झाली, आतां काय करावें ? आर्या, सावध व्हा. हे कांहीं सावध होत नाहींत.

पद–( सुकालीं भूमि ) ह्या चालीवर.

आणिलें संगें मजसी वनीं ॥ क्रमिली तोषें ही अवनी ॥ प्रेमा मजवरी बहु असुनी ॥ त्यजिलें मजसी वहिनीनीं ॥ गेला मजसि कां टाकूनी ॥ झाला अपराधी ह्मणुनी ॥ क्षमा हि त्याची मज करुनी ॥ करिं भाषण या स्मितवदनी ॥ १ ॥

हे आर्या, सावध व्हा, आपल्याला सीता देवी लवकर भेटेल.

**राम**–( सावध होऊन ) आतां कशाची माझ्या दृष्टीस पडते! हे प्राणसखे,

साकी.

तव विरहानें सुंदरि माझें मन व्याकुल झालें गे ॥
भेट देउनी झडकरि सखये मम मन तें सुखवीं गे ॥
व्याकुल मी विपिनीं ॥ झालों सखि तुजवांचूनी ॥ १ ॥

**लक्ष्मण**–प्रभो, आपण शोक करूं नका. आपल्याला सीता देवीच्या दर्शनसुखाचा लाभ लवकरच होईल.

( इतक्यांत वटुवेष धारण करून हनुमंत प्रवेश करितो. )

**हनुमान**–तुह्मी कोण आहां?

पद–(किति सांगूं हो गुण बाळाचे) ह्या चालीवर.

लहान वय सुकुमार दिसतसे कोमल अवयव हे तुमचे ॥ जटा वल्कलें धारण केलीं दिसतां सुंदर परि साचे ॥ कवण्या वंशीं जन्म जाहले कोण पिता

कीं तो तुमचा ॥ निर्जन वनिं या कैसें आला काय हेतु वनवासाचा ॥ १ ॥

**राम**—ऐक,—

**पद**—( वहु नीपतरु ) ह्या चालीवर.

वहु योग्य असा नृपति जगति तो रविवंशिं जाहला ॥ अजनंदन दशरथ हें नाम पावला ॥ ध्रु० ॥
सुरपतिसख राज्य अयोध्येसि तो करी ॥ दैवबळें पुत्र चार असति उदरीं ॥ तोचि मम जनक जाण सत्य वैखरी ॥ लक्ष्मण शत्रुघ्न भरत बंधु हे तरी ॥ भार्या मम जनकसुता जाहलिसे वाला ॥ १ ॥

**पद**—(कपटानृतभूमी ) ह्या चालीवर.

पित्राज्ञा ती ह्मणुनी । आलों सत्वर या स्थानीं ॥ ध्रु० ॥ राम नाम हे वदती मजला । लक्ष्मण हाची बंधू वहिला ॥ आणिली संगें सीता सतिला । नच सन्निध मी वघुनी ॥ हरिली दुष्टें ती रमणी ॥ १ ॥
हे बटो, तूं कोण आहेस?

**बटु**—रामचंद्रा, हा ऋष्यमूक पर्वत दिसत आहे, यावर जे वानर वसले आहेत, त्यांत सुग्रीव ह्मणून कपि आहे, त्याचा मी सचिव आहें. माझें नांव हनुमान्. त्या सुग्रीवाचा वाली नामा बंधु किष्किंधेचा राजा असून उभयतां बंधूंचें अत्यंत वैर आहे. ह्मणून सुग्रीव येथें येऊन रा-

हिला आहे. त्यानें तुह्मांस पाचारण केलें आहे. तर तुह्मीं तिकडे चलावें.

**राम**—चला तर ( असें ह्मणून सर्व जातात. )

( राम लक्ष्मण आणि सुग्रीव येतात, राम आणि सुग्रीव भेटतात. हनुमंत रामाची कथा सुग्रीवास सांगतो. )

**राम**—सुग्रीवा, तुझें आणि वालीचें वैर पडण्याचें कारण काय ?

**सुग्रीव**—रामचंद्रा, पूर्वीं कोणी एक दैत्य किष्किंधेंत येऊन त्यानें वालीला युद्धास बोलाविलें. त्यावेळेस वाली व मी दोघेजण युद्धास गेलों. तेव्हां तो राक्षस गुहेंत शिरला. नंतर मला बाहेर ठेऊन वालीही त्याच्यामागें त्या गुहेंत गेला.

**राम**—मग पुढें ?

**सुग्रीव**—रामचंद्रा,

## साकी.

**झाले ते दिन बहुतचि त्याला, जाऊनि त्या विवरांत ॥**
**रक्तस्राव मग पाहुनि, तेव्हां बंधु पावला मृत्य ॥**
**वाटे ऐसें मनीं ॥ आलों नगरा परतोनि ॥ १ ॥**

मग वाली त्याचा वध करून बाहेर आला; आणि मी तेथें नाहीं असें पाहून, मला राक्षसांनीं वधिलें असें वाटून त्याला बहुत दुःख झालें, आणि नगरांत आला. नंतर—

## दिंडी.

**पाहुनी मज निजराज्यपदीं त्याला ॥**
**अनीवाराचि कोप तो मनीं आला ॥**

**मारण्यास्तव धांवला मजसि जेव्हां ॥**
**निघालों मी घेऊनि सचिव तेव्हां ॥ १ ॥**

तों येथें येऊन राहिलों. अशा रीतीनें त्यानें राज्य घेतलें, आणि माझ्या स्त्रीचेंही हरण केलें.

**राम**–सुग्रीवा, वाली येथें कां येत नाहीं ?

**सुग्रीव**–रामचंद्रा, पूर्वीं दुंदुभीनामा दैत्य किष्किधेंत आला होता. त्याला वालीनें मारून त्याचें शिर फेंकून दिलें तें—

**पद्**–( चाल लावणीची )

**थोर तपोधन नाम मतंगज पूर्वीं येथें तप करि कीं ॥ राक्षसशिर तें येउनि तेव्हां त्याच्या करिं हो पडलें कीं ॥ त्यातें पाहुनि कोप पावला देई मग तो शापासी ॥ क्षण न लागतां या स्थलिं येतां मृत्यू येईल वालीसी ॥ १ ॥**

ह्मणून वाली येथें येत नाहीं. बरें पण रामचंद्रा, आकाशमार्गानें कोणी एका स्त्रीला हरण करून नेत असतां, तिनें आपले अलंकार वस्त्रांत गुंडाळून खालीं टाकिले, ते आह्मीं ठेविले आहेत. ते तुमच्या स्त्रीचे असल्यास पहावे.

**राम**–ठीक आहे. पाहूं कोठें आहेत ते.

**सुग्रीव**–हनुमंता, ते अलंकार घेऊन ये. ( आज्ञा, असें ह्मणून अलंकार घेऊन येतो व रामापुढें ठेवितो. )

**राम**–( दुःखानें ) लक्ष्मणा, हे अलंकार माझ्या प्रियेचेच आहेत.

**लक्ष्मण**–होय, सीतादेवीचेच आहेत.

**राम**–( दुःखानें श्वास टाकून ) प्रिये, मला सोडून कोठें गेलीस ?

**पद**–(जरी असे धर्म मम साचा ) ह्या चालीवर.

**प्राणप्रिये मजसी आतां या समयीं दर्शन देईं ॥ ॥ ध्रु० ॥ टाकुनियां रोष मनींचा सखये तूं झडकरी येईं ॥ विरहानल तव हा साचा जीवित मम हरूनी नेईं ॥ अपराधि हा जन जरी ॥ कोप सुंदरी ॥ त्यजुनियां देईं ॥ भेट सखे मज या समयीं ॥ १ ॥**

**सुग्रीव**–रामचंद्रा, आपण शोक करूं नका. मी प्रतिज्ञापूर्वक आपली स्त्री त्या दुष्टास शासन करून आपल्यास आणून देईन.

**राम**–सुग्रीवा, मीही प्रतिज्ञापुरःसर सांगतों, कीं मी वालीचा वध करून तुला राज्य व तुझी स्त्री देईन.

**सुग्रीव**–रामचंद्रा, वाली महापराक्रमी आहे, तेव्हां त्याचा वध आपले हातून होईल किंवा नाहीं, ह्याबद्दल मी शंकित आहें.

**राम**–सुग्रीवा, ही तुझी शंका व्यर्थ आहे. तथापि तुला कांहीं प्रत्यय पहाणें असेल, तर चल दाखवितों.

**सुग्रीव**—माझेही मनांत तेंच आहे.

(असें ह्मणून सर्व जातात.)

(वाली आणि त्याचा प्रधान प्रवेश करितात.)

**वाली**—प्रधानजी, मी आज असें ऐकिलें आहे कीं,

## साकी.

दशरथनंदन राममनुज तो भ्रातृसहित वनिं आला ॥
सूर्यपुत्र सुग्रीव तयानें भेटुनि मित्रचि केला ॥
दोघे साह्यातें ॥ देती परस्पर वचनातें ॥ १ ॥

**प्रधान**—महाराज, प्रत्यक्ष काल जरी आला, तरी तो महाराजांच्या पुढें उभा राहण्यास समर्थ होणार नाहीं. मग मनुष्याची कथा काय ?

**वाली**—तें खरें आहे, तथापि या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे. ह्मणून तुह्मीं त्यांचा काय विचार आहे, याचा शोध करून, मी जलमंदिरांत असेन तेथें येऊन मला कळवा.

**प्रधान**—आज्ञेप्रमाणें करितों (असें ह्मणून दोघे जातात.)

(राम, लक्ष्मण, सुग्रीव व हनुमान प्रवेश करितात.)

**राम**—सुग्रीवा, आतां तुझ्या मनाची शंका दूर झाली कीं नाहीं.

**सुग्रीव**—हे प्रभो, आपण एका बाणानें त्या सप्तताळांचा भेद केला, ह्मणून माझ्या मनाची खात्री झाली कीं, आपण वालीचा वध कराल.

**राम**–सुग्रीवा, आतां तूं वालीबरोबर युद्ध करण्याची तयारी कर. हा मी तुझ्या मागून आलोंच.

**सुग्रीव**–ठीक आहे. ( हनुमंतासह जातो. )

**राम**–लक्ष्मणा, सुग्रीवाच्या भाषणावरून वाली मोठा पराक्रमी आहे असें वाटतें.

## साकी.

वचन दिलें मीं सुग्रीवासी मारिन तव बंधूतें ॥
मजवरि ठेउनि विश्वासा तो गेला कीं युद्धातें ॥
पुरवाया त्याचा ॥ जातों हेतू हा मनिंचा ॥ १ ॥

**लक्ष्मण**–मीही आपल्याबरोबर येतों ( रामलक्ष्मण जातात. )

( वाली प्रवेश करितो. )

**वाली**–सुग्रीवाचा व माझा संग्राम नुकताच झाला, व तो पराभव पावून गेला असून आतां—

## दिंडी.

हेंचि वाटे आश्चर्य थोर मातें ॥
युद्ध बंधू इच्छितो पुनरपी तें ॥
कळेना मज संशयीं चित्त जातें ॥
मानवी कीं रघुपती ईश हें तें ॥ १ ॥

असो, कांहीं असलें तरी ज्या अर्थी मला त्यानें युद्धास पाचारण केलें, तेव्हां मला गेलेंच पाहिजे. परंतु, प्रियेची भेट घ्यावी नंतर जावें; पण कदाचित् ती मला जाण्यास

विघ्न करील. हरकत नाहीं. तिची समजूत कशीही करितां येईल. (इकडे तिकडे फिरून) हेंच तिचें मंदिर, यांत प्रवेश केला असतां मनाला फारच आनंद होतो. अरे पण हें काय! या मंदिरांत तर अगदीं शून्य दिसत आहे! ही माझी प्रिया मंचकावर बसली आहे, व एक दासी मात्र जवळ उभी आहे. या प्रियसखीचें मुख तर अगदीं निस्तेज व चिंताग्रस्त झालें आहे. तेव्हां हिला पुनः युद्धाचें वर्तमान समजलें असें वाटतें. अहाहा! तथापि ही—

**पद्**– ( राग बिहाग. )

**ही खनि लावण्याची ॥ चिंतेनें त्या हरिणाक्षीच्या, पांडुरता मुखिं शोभत साची ॥ ध्रु० ॥ झळके कैसी शशिवदनेच्या, मौक्तिकमाला स्तनदेशींची ॥१॥ किंवा चपला नभदेशींची, अवतरली कीं मूर्ति रतीची ॥ निर्मुनि इजला वाटे विधिच्या, सीमा झाली चातुर्याची ॥ ही ख० ॥**

आतां ही दासीजवळ काय बोलते तें ऐकूं ह्मणजे समजेल.

**दासी**—बाई साहेब, मी किती वेळ येथें उभी आहें. आपल्याला विनंती करितें, तथापि आपण कांहींच बोलत नाहीं, व वेणीफणी आंगधुणें कांहींच करीत नाहीं, तेव्हां आपल्याला झालें तरी काय? सरकार तर नुकतेच विजयी होऊन आले, तरी आपण काळजी कसली करितां?

**तारा**–सखे, तूं ह्मणतेस तें खरें, प्राणनाथ विजयी होऊन आले, पण त्यांना पुनः युद्धास बोलाविलें आहे. तेव्हां ते रामलक्ष्मण कांहीं सामान्य नाहींत, ह्मणून मला चिंता वाटते.

**वाली**–हें वर्तमान तर हिला समजलें खचित, तर हिचें समाधान केलेंच पाहिजे.

**दासी**–बाई साहेब, महाराजांच्या पुढें काळ जरी आला तरी ते त्याला जिंकितील, असें असतां आपण काळजी कां करितां ? ( इतक्यांत वाली पुढें येतो; त्याला पाहून ) अगबाई ! सरकारही इकडेच आले.

**वाली**–( दासीस ) कायग, काय चाललें आहे ?

**दासी**–कांहीं वर्तमान ऐकिल्यापासून बाईसाहेबांस थोडीसी चिंता लागली आहे.

**वाली**–प्रिये, मी सन्निध असतां तुझ्या मनाला कसली चिंता प्राप्त झाली आहे ? ( असें ह्मणून तारेस आलिंगून तिच्यासह मंचकावर बसतो. )

**तारा**–प्राणनाथ, आपण जवळ असतां मला चिंता कसली असणार ? पण माझी इतकीच विनंती आहे कीं आपण पुनः युद्धास जाऊं नका. कारण मी असें ऐकिलें आहे—

**पद**–( बघुनि उपवना विरहाग्निची ) ह्याचा.

**रविकुलिं जन्मुनी दशरथनामें योग्य असा नृपती ॥**

राज्य तयाचें अयोध्येसी पुत्र चार असती ॥ ज्येष्ठ पुत्र तो राम तयाचा बंधु सवें युवती ॥ पित्राज्ञेनें येउनि केली शीघ्र वनीं वसती ॥ दुष्ट राक्षसें हरिली भार्या ह्मणुनि गिरीवरती ॥ तव वध योजुनी तव बंधूतें साह्यचि ते होती ॥ चाल ॥ यासाठिं तुह्मासी विनवी ही दासी ॥ आदिपुरुष पुजावा आणुनि मंदिरासी ॥ वैर नको हें शरण रिघा त्यासी ॥ चाल पहिली ॥ सुग्रीवासी राज्य अर्पुनी सेवुं वनाप्रती ॥ ह्मणुनि आणावी चित्तीं माझी प्राणप्रिया विनती॥१॥

तेव्हां रामलक्ष्मण कांहीं सामान्य मानव नाहींत, ह्मणून आपण त्यांस शरण जावें अशी या दासीची विनंति आहे.

**वाली**–प्रिये, हें काय? विनंति कसली? तूं अशी भितेस काय? अग—

**पद**–( राग मालकंस. )

**व्यर्थ सखे दुःखातें ॥ करिसी कां नच कळतें ॥ध्रु०॥ समरीं जिंकिन त्या काळासी ॥ शक्ति किती मग मानवियासी ॥ वधितों सुंदरि सत्वर त्यासी ॥ ह्मणुनी कोमल तव चित्तासी ॥ स्वस्थ करीं कांते॥१॥**

प्रिये, ह्मणून तूं अगदीं स्वस्थ रहा. जर ते ईश्वरी अवतार असतील, तर तुझ्या इच्छेप्रमाणें मी त्यांना शरण जाऊन सुग्रीवाला राज्य देईन. तसें नसेल तर आतां त्यांचा वध करून येतों. कशी काय तयारी झाली आहे हें, पहाण्यास मी कंचुकीस पाठविलें आहे.

( इतक्यांत कंचुकी येतो. )

**कंचुकी**—महाराज, ते अगदीं सिद्ध होऊन सरकारची वाट पहात आहेत.

**वाली**—हा मी आलों पहा. प्रिये, तूं अगदीं स्वस्थ रहा. हा मी आतां त्यांस जिंकून येतों.

( असें ह्मणून जातो. )

**तारा**—देवा, हें काय संकट मजवर आणिलेंस ! आतां तुझ्यावांचून कोण त्राता आहे !

**पद्**—( कृतांत पुरुषा ) ह्या चालीवर.

**भवांत कमलावरा ॥ प्रार्थितें तुजसि श्यामसुंदरा ॥ ध्रु० ॥ असुरांचें तूं मर्दन करिसी ॥ दयाब्धि केवल दीन जनासी ॥ अससी तूं वा खरा ॥ दयाळा ॥ १ ॥ शरण तुझ्या मी पदकमलासी ॥ कृपाघना मम प्राणप्रियासी ॥ रक्षीं करुणाकरा ॥२॥**

**दासी**—बाईसाहेब, अशी चिंता काय करीत बसावें? सरकार आतां विजयी होऊन येतील. उठा, तोंपर्यंत मंदिराच्या मागच्या मोतीबागेंत अमळ हिंडूं ह्मणजे बरें वाटेल.

**तारा**—बरें, तुझ्या इच्छेप्रमाणें कां होईना. पण आपल्या मुख्य कंचुकीस सांगून ये कीं, युद्धांतील वर्तमान मला वारंवार येऊन कळीव. जा.

( दासी आज्ञा, असें ह्मणून आंत जाऊन येते. )

**दासी**—बाईसाहेब, कळविलें. आतां चलायचेंना बागेंत ?

**तारा**—चल तर.

**दासी**—चलावें असें इकडून.

**तारा**—( कांहीं पुढें जाऊन ) मला असे अपशकुन कां बरें होतात ?

**पद**—( वेदाभ्यासी ब्राह्मण सारे ) ह्या चालीवर.

**उंच सखल हा मार्ग नसोनी चरणचि आडखळती सखे गे ॥ ध्रु० ॥ सव्य बाहु नेत्र गे स्फुरती ॥ शकुनि पक्षि हे दुःखित दिसती ॥ विरहसमय हा मज सुचवीती ॥ धडधड उर करितें बहू गे ॥ १ ॥**

देवा, आतां या संकटांतून मुक्त करणारा तूंच आहेस !

( भवांत कमलावरा हें पूर्वोक्त पद पुनः ह्मणते. )

**दासी**—बाईसाहेब, सारखा तोच विचार करून मनाला त्रास कां देतां ? कांहीं थोडासा धीर धरा.

**तारा**—कायग, अजून कोणीच आलें नाहीं ?

( इतक्यांत धाबऱ्या धाबऱ्या कंचुकी येतो. )

**कंचुकी**—हाय हाय ! ! ! बाईसाहेब ! घात झाला ! उठा लवकर.

**तारा**—( ऐकून ) हे प्राणप्रिया ! आतां तुला कोठें पाहूं !

( असें ह्मणून मूर्छित होते. )

**दासी**–( वारा घालिते. ) बाईसाहेब, सावध व्हा सावध व्हा.

**तारा**–( सावध होऊन. ) दासी, माझे प्राणनाथ कोठें आहेत ? तिकडे मला न्या.

**दासी**–चलावं असें इकडून ( असें ह्मणून जातात. )

( तदनंतर मरणोन्मुख झालेला वाली, रामलक्ष्मण, सुग्रीव व सेवक प्रवेश करितात. )

**वाली**–रामचंद्रा, तूं क्षत्रिय आहेस, आणि एकपत्नीही आहेस. असें असून दुसरी अपकीर्तिभार्या कां वरिलीस ? मी अपराधी नसतां, माझा वध करण्याकरितां, मजवर चोरून बाण कां टाकिलास ?

**राम**–वाली, तूं मोठा अपराधी व पापी आहेस. तूं आपल्या बंधूच्या स्त्रीचा अपहार केला आहेस. ह्मणून तुझ्यासारख्या दुष्टांना शासन करण्याकरितांच मी वनांत संचार करीत आहें.

**वाली**–हे प्रभो रामचंद्रा, धन्य धन्य ! तुझ्या हातून मला मरण प्राप्त झालें तेव्हां मी मोठा धन्य आहें ! ह्याच मार्गानें रावण तुझ्या स्त्रीला घेऊन गेला. मी त्याचें शासन करून तिला सहज परत आणिलें असतें, परंतु माझ्या नशीबीं तुझी सेवा घडायाची नव्हती. असो. रामचंद्रा, आपण माझ्या अपराधाची क्षमा करून माझा पुत्र अंगद ह्याच्यावर कृपा करावी. सुग्रीवा, आपलें वैर संपलें. माझ्या अंगदाचा तूं पिता होऊन त्याचें पुत्राप्रमाणें पालन कर.

तुझ्यामुळें मला अंतकाळीं रामचंद्राचें दर्शन झालें, हा तुझा मोठा मजवर उपकार आहे. आतां तुह्मीं सर्व मिळून रामचंद्राचें साह्य करून त्या दुष्टास शासन करून सीता देवीला रामचंद्राचे स्वाधीन करा. आतां माझ्याच्यानें बोलवत नाहीं. ( राम, राम, असें ह्मणून प्राण सोडितो. )

( सुग्रीव अंगद व इतर सर्व वानर शोक करितात. )

( इतक्यांत तारा येते. )

**तारा**–( वालीच्या प्रेतास कवटाळून. )

**पद**–( जरी रात्रीचा काळ ) ह्या चालीवर.

**आजि उचित नसे प्राणप्रिया हें केलें ॥ निजदासिस कैसें त्यजिलें ॥ नको युद्ध आतां ऐसें बहु विनवीलें ॥ दुर्दैवें मम नच गणिलें ॥ चाल ॥ आदि पुरुष राघव ऐसें ॥ जाणुनी मग केलें कैसें ॥ चाल॥ हतदैवा हें काय असें त्वां केलें ॥ हरुनी मम सौख्य किं नेलें ॥ १ ॥**

प्राणनाथ, मी तुह्मांला जाऊं नका ह्मणत असतां कसे गेलां ?

**पद**–( रमवाया ) ह्या चालीवर.

**विरह कसा साहूं ॥ प्रिया हा ॥ ध्रु० ॥ एक क्षण मजवीण तुह्मासी ॥ चैन नसे हो आतां कैसी ॥ त्यजिली एकटि या स्थलिं दासी ॥ प्राण कसा ठेवूं ॥ १ ॥**

आतां मला वांचून तरी काय करावयाचें आहे ? मी सहगमन करितें.

**राम**—तारे, असें साहस करूं नको, तूं सुज्ञ आहेस. तूं विचार करून पहा कीं, मरण हें सर्व प्राणिमात्रांस लागलें आहे.

**तारा**—आपली आज्ञा मला मान्य आहे, पण रामचंद्रा, माझ्या अंगदावर कृपा ठेवावी.

**राम**—तारे, तूं काळजी करूं नको. जसा मला सुग्रीव तसाच अंगद आहे. सुग्रीवा, आतां तुह्मीं वालीचें दहन करून किष्किंधेंत जा. आह्मीं चार मास येथेंच या गुहेंत वास करितों.

**सुग्रीव**—रामचंद्रा, मला राज्य नको. मी आपली सेवा करून आपल्याजवळ राहीन.

**राम**—सुग्रीवा, तुला माझ्या आज्ञेनें राज्य केलेंच पाहिजे.

**सुग्रीव**—तर मग आपण माझ्या नगरांत प्रवेश करावा.

**राम**—सुग्रीवा,

### श्लोक.

ऐके वा मम भक्त बंधु भरतें माझ्या वियोगें असें ।
टाकूनी निजराज्य वल्कल जटा प्रेमेंचि सेवीतसे ॥
नंदीग्रामिं सखा असे नयनिं या त्यासी न हा देखतां ।
सेवी हें नच राज्य भोग कधिंही जाणें सख्या तत्वतां ॥ १ ॥

**सुग्रीव**–आपली आज्ञा प्रमाण. ( असें ह्मणून वालीचें प्रेत घेऊन सर्व जातात. )

**राम**–लक्ष्मणा, चल आपण गुहेकडे जाऊं ( असें ह्मणून जातात. )

**दुसरा अंक समाप्त.**

---

# अंक तिसरा.

( राम लक्ष्मण प्रवेश करितात. )

**राम**–( दुःखानें ) लक्ष्मणा, माझी प्राणप्रिया अद्यापि मला भेटत नाहीं. ती जीवंत आहे किंवा मरण पावली हेंही समजत नाहीं. ( कोपानें ) ज्या दुष्टानें तिचें हरण केलें असेल, त्याचा पुत्रपौत्रासहित नाश करीन. ही मी प्रतिज्ञा करितों. हे हरिणाक्षि प्राणसखे—

**पद**–( मज भीति नसे ) ह्या चालीवर.

**सखये तव विरह मला जाळि अंतरीं ॥ दर्शन दे मजसि आतां येउनि झडकरी ॥ध्रु०॥ तवविरहें किमपि मला चैन नसे गे ॥ शीतल परि चंद्र बहुत ताप देत गे ॥ मजवांचुनि सौख्य कसें तुजसि सुंदरी ॥१॥**

लक्ष्मणा, हा सुग्रीव पहा कसा मदांध झाला आहे ? खुशाल राज्य व स्त्रीसुखांत निमग्न झाला आहे ! आज चार महिने झाले तरी माझ्या प्रियेच्या शोधाचें त्याला स्मरण सुद्धां होत नाहीं !

## साकी.

दिधलें मजसी वचन किं त्यानें देइन मी तव कांता ॥
ऐसें असुनी निमग्न झाला राज्यसुखीं बहु आतां ॥
कैसा निर्दय तो ॥ आपुलें वच नच पाळीतो ॥ १ ॥

( क्रोधानें ) हा दुष्टा कृतघ्ना ! वालीप्रमाणें तुझाही वध करितों.

**लक्ष्मण**—हे आर्या, आपण कोप कशास करितां ? मीच आतां त्या दुष्टाचा नाश करितों. (असें ह्मणून धनुष्य व खड्ग धारण करितो.)

**राम**—( शांत होऊन ) लक्ष्मणा, त्याचा वध करणें योग्य नाहीं. तूं जाऊन त्याला नुसतें भय मात्र दाखीव, व तो माझ्या कार्यांत निमग्न आहे किंवा नाहीं हें पाहून ये. अरे—

## दिंडी.

मित्र आहे सुग्रीव मम जिवाचा ॥
राज्य दिधलें मीं वधुनि शत्रु त्याचा ॥
उचित नाहीं मारणें अतां त्यासी ॥
स्वल्प आणीं कोप तूं त्याजपाशीं ॥ १ ॥

**लक्ष्मण**—बरें आहे, आपल्या आज्ञेप्रमाणें करितों.

**राम**—लक्ष्मणा, तूं परत येई तोंपर्यंत मी या गुहें-तील शोभा पहातों.

( असें ह्मणून जातात. )

( सुग्रीव हनुमंतासह प्रवेश करितो. )

**हनुमान**—महाराज, आपण स्वस्थ काय बसलां आहां? रामचंद्रांनीं आपल्याला राज्य दिलें असून, आपण त्यांच्या सीतेच्या शोधाविषयीं अजून कांहींच विचार केला नाहीं.

**सुग्रीव**—खरेंच हनुमंता, मला मुळींच स्मरण नव्हतें.

**हनुमान**—महाराज, रामचंद्रांस जर कोप आला, तर आपणां सर्वांस एका क्षणांत भस्म करून टाकितील.

( इतक्यांत द्वारपाल येतो. )

**द्वारपाल**—महाराज, लक्ष्मण महाराजांची स्वारी आपल्या भेटीकरितां आली आहे. त्यांची मुद्रा अत्यंत क्रोधयुक्त दिसत आहे.

**सुग्रीव**—हनुमंता, तूं जाऊन वानरांना सीतेच्या शोधाला पाठवून दे. मी तारेला लक्ष्मणाचें शांतवन करण्याकरितां पाठवून देतों.

( असें ह्मणून जातात. )

( लक्ष्मण प्रवेश करितो. )

**लक्ष्मण**—पहा, हा सुग्रीव कसा निर्दय आहे. रामचंद्रांनीं त्याला राज्य दिलें असून तो खुशाल सीतेचा शोध न करितां राज्यसुखांत निमग्न झाला आहे. ( इकडे तिकडे फिरून ) हेंच त्याचें मंदिर. ही तारा मध्यें येथें उभी राहिली आहे असें वाटतें. होय. तीच ही. ( पुढें जाऊन ) तारे, कोठें आहे तो सुग्रीव ?

**तारा**–( वंदन करून ) भाऊजी, पण आपल्याला इतका कोप कां आला आहे ?

**लक्ष्मण**–तारे, तो कृतघ्न सुग्रीव कोठें आहे, तें अगोदर सांग.

**तारा**–अहाहा ! काय राग पण !! आपणच त्याला राज्य दिलें. आणखी तो आतां राज्यसुख भोगतो ह्मणून आपणच रागावतां ? वा: !

**कामदावृत्त.**

**प्राणमित्र तो तुह्मिच मानिला ॥**
**तुह्मिच दीधलें राज्य त्याजला ॥**
**शोधनीं असे नित्य मग्न तो ॥**
**आपुला असे व्यर्थ कोप तो ॥ १ ॥**

**लक्ष्मण**–तारे, व्यर्थ कोप कसा तो सांग.

**तारा**–व्यर्थ नाहीं तर काय ? तुमच्या कार्यांत तो निरंतर मग्न आहे. चला आतां, तो आपल्या भेटीची वाट पहात आहे.

**लक्ष्मण**–( शांत होऊन ) चल तर.

( असें ह्मणून जातात. )

( तदनंतर सुग्रीव हनुमंतासह प्रवेश करितो. )

**सुग्रीव**–हनुमंता, तारेनें लक्ष्मणाचा कोप शांत केला असावा.

( लक्ष्मण प्रवेश करितो. सुग्रीव व हनुमंत वंदन करितात. )

**लक्ष्मण**–सुग्रीवा, तूं राज्यसुखांत निमग्न होऊन

रामचंद्राला विसरलास वाटतें. अरे, चार महिने झाले तरी अजून सीतादेवीच्या शोधाविषयीं तूं कांहींच तजवीज केली नाहींस ?

**हनुमान**—अहो महाराज, तुह्मांला वाटतें काय तो एकटा मीच रामचंद्राचा भक्त आहें. परंतु, सुग्रीवही तसाच आहे; तो कांहीं स्वस्थ बसला नाहीं. तो रामचंद्राच्या कार्यांत नेहमीं जागृत आहे. हजारों वानर सीतादेवीच्या शोधार्थ चोहोंकडे पाठविले आहेत.

**लक्ष्मण**—तसें असेल तर ठीक आहे; परंतु सुग्रीवा, ऊठ पहा, रामचंद्र एकटे सीतेवांचून शोक करीत आहेत. तर तिकडेच आपण सर्व जाऊं.

**सुग्रीव**—चला, हा मी तयार आहें.

(असें ह्मणून जातात.)

(राम प्रवेश करितो.)

**राम**—(चिंतायुक्त होऊन) काय करावें ? लक्ष्मणाला जाऊन पुष्कळ वेळ झाला; त्यानें सुग्रीवावर फार कोप तर केला नसेलना ? (दुःखानें) हे प्रिये सीते—

**पद**—(निर्धनतेनें लज्जा उपजे) ह्या चालीवर.

**प्राणप्रिये मम सीते सखये दर्शन दे झडकरी ॥ येऊनीयां तूं सुंदरी ॥ विरह तुझा हा सोसेनागे एकहि तो क्षणभरी ॥ जाळी मजसी गे अंतरीं ॥ मजवांचुनि तुज चैन पडेना पूर्वीं कधिं मंदिरी ॥ सोडुनि गेलिस कैसी दुरी ॥ ॥ चाल ॥ तुजवांचुनि मजसी**

सौख्य सखे तें नसे ॥ हें जगतचि सारें शून्य नेत्रिं या दिसे ॥ मम दुर्दैवें तुज दुष्टें हरिलें असे ॥ न कळे कोठें वदनशशी तो लोपुनि गेला दुरी ॥ जो हा विरहताप तो हरी ॥ १ ॥

हाय हाय ! ! प्रिये,

पद–( बेहाग. )

शिव शिव शिव आजि सखे जाहलें कसें ॥ काय करूं दुष्टगृहीं वास तव असे ॥ ध्रु० ॥ विरहें मम व्याकुल अति चित्त तुझें गे ॥ तैशामधिं देतिल ते दुःख बहू गे ॥ साहुनि मग राहिल कां प्राण त्यांसि गे ॥ व्याकुल या चिंतेनें चित्त होतसे ॥ १ ॥

( दुःखयुक्त असा बसतो. )

(लक्ष्मण व सुग्रीव सचिवासह प्रवेश करितात.)

**लक्ष्मण**–सुग्रीवा, रामचंद्र सीतेच्या विरहामुळें जरी दुःखी आहे, तरी कसा दिसत आहे पहा.

पद–( पंकें भरली ) ह्या चालीवर.

कोमल सुंदर तनुही शोभे लोचन कमलापरि दिसती ॥ पूर्णेंदू परि रमणिय ऐसें तेज दिसे वदनावरती ॥ ध्रु० ॥ सीतेच्या त्या विरहानें जरि तनु ही ऐशी कृश झाली ॥ दिसतो तरी हा किति हो आतां मोहक मजला या वेळीं ॥ १ ॥

( पुढें होऊन ) आर्या, मी आपल्याला वंदन करितों.

**राम**—कल्याण, वत्सा लक्ष्मणा, आलास! बरें, तो सुग्रीव कोठें आहे? (सुग्रीव सचिवासह पुढें होऊन वंदन करितो.)

(राम व सुग्रीव भेटतात.)

**राम**—सुग्रीवा, माझ्या प्रियेच्या शोधाला वानर पाठविले कां?

**सुग्रीव**—रामचंद्रा, मी पुष्कळ वानर शोधाला पाठविले आहेत. आणखी हे आहेत, ह्यांना आपण दक्षिणेकडे जाण्यास आज्ञा द्यावी.

**राम**—सुग्रीवा, हनुमंत, नल, नील, जांबुवंत आणि अंगद वगैरे ह्यांस दक्षिणेकडे पाठीव.

**सुग्रीव**—हनुमंता, तुह्मी सर्वजण जाऊन एक महिन्याचे आंत सीतादेवीचा शोध करून आलें पाहिजे. जर शोध न करितां परत आलां तर मी सर्वांस देहांत शिक्षा देईन.

**हनुमान**—प्रभो रामचंद्रा, मला सीतादेवी आपला सेवक ह्मणून ओळखील अशी खूण द्या.

**राम**—हनुमंता, हें माझें अंगुलीयक सीतेला दाखीव, ह्मणजे ती तुला ओळखील. लवकर परत ये हो.

**हनुमान**—बरें आहे. आह्मी जातों आतां.

(वंदन करून जातात.)

**राम**—सुग्रीवा, चला आपण या गुहेची शोभा पहावयास जाऊं. (असें ह्मणून जातात.)

(तदनंतर समुद्रकांठीं वसलेले वानर प्रवेश करितात.)

**नल**—जांबुवंता, आतां काय करावें? हा समुद्र केवढा भयंकर दिसत आहे!!

**जांबुवंत**—नला, आतां काय करावयाचें? आपण हिंडत असतांना स्वयंप्रभेच्या गुहेंत गेलों, आणि पुष्कळ अरण्यांतूनही हिंडलों; परंतु समुद्राचें उल्लंघन कसें करावें हें सुचत नाहीं.

**नल**—अंगदा, आतां आपण सुग्रीवाकडे परत जाऊंया, नाहींतर येथेंच गुहांतून लपून राहूं.

**अंगद**—जांबुवंता, आपण गुहेंत राहूं. मी परत कांहीं येणार नाहीं, कारण, तुह्मांला कदाचित सुग्रीव सोडील पण मला मारील. मी त्याच्या शत्रूचा पुत्र आहें.

**जांबुवंत**—अंगदा, असें मनांत आणूं नको; कारण तुझ्यावर रामचंद्राची प्रीति आहे. आणखी तुह्मी ह्मणतां आह्मी गुहेंत राहूं, पण हें व्यर्थ आहे; कारण—

### साकी.

**लपलां जरि हो आतां तुह्मी जाउनि पाताळासी ॥**
**दाशरथीचा बाण अमोघचि मारिल तो तुह्मासी ॥**
**विचार हा मनिंचा ॥ टाकुनि द्यावा तो साचा ॥१॥**

**अंगद**—जांबुवंता, मग काय करावयाचें? आतां दर्भ आंथरून प्राणत्याग करूं.

( असें म्हणून दर्भ आंथरून बसतात. )

( इतक्यांत संपाति पक्षी प्रवेश करितो. )

**संपाति**–( आनंदानें ) अहाहा ! ! मला आज दैवानें भक्ष्य सांपडलें. आतां मी रोज एकेकाला खाईन.

( असें ह्मणून पुढें येतो. )

**वानर**–( त्याला पाहून भिऊन ) धन्य धन्य जटायु पक्षी ! कारण त्यानें रामचंद्राकरितां प्राणत्याग केला, धन्य आहे तो. आमचे हातून रामकार्य झालें नाहीं, ह्मणून आह्मी येथें व्यर्थ मरणार !

**संपाति**–( ऐकून पुढें येऊन ) काय, माझ्या भावाचें नांव घेणारे हे कोण असावे बरें ? बाबांनो, तुह्मी कोण आहां ? माझ्यापासून तुह्मांला अभय आहे, सांगा.

**अंगद**–ऐक, आह्मी अयोध्येच्या दाशरथी रामाचे सेवक आहों. त्या रामचंद्राची पत्नी, लंकेचा राजा रावण यानें हरण केली आहे. तिचा आह्मी शोध करीत आहों. तिला सोडवितांना जटायु मरण पावला. ह्मणून आह्मीं त्याचें स्मरण केलें.

**संपाति**–( दुःखानें ) हरहर ! हे जटायो—

**पद**–( हा सकल देह रक्तचंदनें विलेपिला ) ह्या चा०

**हे प्रियसख्या कैसा मज टाकुनियां गेला ॥ परकार्यीं योग्य ह्मणुनि प्राण तुवां दिधला ॥ ध्रु ०॥ दर्शन तें मजसि देई ॥ धांउनि सत्वर तूं येईं ॥ व्याकुल कीं या समईं ॥ प्राणचि हा झाला ॥ १ ॥**

**मजवरि बहु प्रेम असुनि ॥ गेला कां मज सोडुनि ॥**
**सौख्य अतां तुजवांचुनि ॥ होत नच मला ॥ २ ॥**

हे प्रियबंधो, आतां तुला कोठें पाहूं ! !

**अंगद**—बाबा, तूं कोण, व असा शोक कां करितोस?

**संपाति**—वानर हो, ऐका. मी आणि जटायु उभयतां बंधु आहोंत. तो माझा धाकटा भाऊ. तो आणि मी एके दिवशीं सूर्यमंडळापर्यंत उडत गेलों, त्या वेळेस,

## साकी.

**सूर्यकिरण ते तप्त लागतां घाबरून तो गेला ॥**
**पाहुनि त्याला त्या वेळीं मी धांवुनि हृदयीं धरिला ॥**
**पक्ष मी त्या वेळीं ॥ पसरुनि छाया ती केली ॥१॥**

त्या वेळीं माझे पक्ष दग्ध झाले. आणि मी खालीं पडलों. नंतर तो उडून गेला. मग येथें चंद्रमा मुनि होते, त्यांच्याकडे गेलों. त्या वेळेस त्यांनीं मला बोध केला, आणि सांगितलें कीं, ज्या वेळेस रामचंद्राची कथा तुला वानर सांगतील, त्या वेळेस तुला नवीन पक्ष येतील. आतां मला समुद्राच्या कांठीं उचलून न्या, ह्मणजे मी बंधूला तिलांजलि देतों. नंतर सीतेचा शोध सांगेन.

(वानर तसें करितात.)

**संपाति**—( दुःखानें ) हाय हाय !

**पद**—( नयनाश्रुजलें गळलीं ) ह्या चालीवर.

**त्यजुनि सख्या मजसी ॥ गमन करसेंबा स्वर्गीं क-**

**रिसी ॥ ध्रु० ॥ प्राणाहुनि प्रिय मी तुज असतां ॥ विदित न केलें सोडुनि जातां ॥ सौख्य कसें वा मजविण आतां ॥ होइल तें तुजसी ॥ १ ॥ दुःखाश्रूंच्या उदकांजळिला ॥ पूर्ण भरोनी देतों तुजला ॥ तृषित बहु तूं प्राशुनि तिजला ॥ शांतवि चित्तासी ॥ २ ॥**

( असें ह्मणून तिलांजलि देतो. )

वानरहो, मला पुनः पूर्वस्थळीं घेऊन चला.

( वानर तसें करितात. )

वानरहो, ती पहा, त्रिकूट पर्वतावर लंका नांवाची नगरी आहे. तेथें अशोकवनिकेंत सीता बसलेली आहे. जवळ राक्षसी बसल्या आहेत, परंतु ती लंका येथून समुद्रांत शतयोजनें दूर आहे. काय करूं ? मला पक्ष असते, तर मी रावणाला मारून सीतेला आणिलें असतें. परंतु उपाय नाहीं. तुह्मांपैकीं ज्यास शतयोजनें समुद्र उल्लंघून जाण्याची शक्ति असेल, तोच सीतेला पाहील. उठा तर, यत्न करा. हे पहा मला नूतन पक्ष फुटावयास लागले. असो, आतां मी जातों. ( असें ह्मणून जातो. )

**अंगद**—संपातीनें तर आपल्याला उत्तम वर्तमान सांगितलें, पण आपणांमध्यें शतयोजनें समुद्र उल्लंघून पुनः परत येण्याची शक्ति कोणास आहे ?

**नल**—अंगदा, माझी कांहीं लंकेंत जाण्याची शक्ति नाहीं.

**अंगद्**—मी लंकेंत जाईन. परंतु माघारा येईन कीं नाहीं कोण जाणे.

**जांवुवंत**—अंगदा, मीं पूर्वी एकवीस वेळां पृथ्वीप्रदक्षिणा केली. पण आतां माझें ह्मातारपण झालें आहे. तेव्हां मला जाववेल कीं नाहीं हें सांगवत नाहीं.

**अंगद्**—मग आतां काय करावयाचें? कोणाची शक्ति जाण्याची नाहीं, तेव्हां आतां प्राणत्याग करावा.

**जांवुवंत**—अंगदा, काळजी करूं नको, आपल्यामध्यें तसा जाणारा वीर आहे.

**साकी.**

**प्रताप रुद्रासमची ज्याचा ऐसा सन्निध असतां ॥**
**अंजनिबालक प्रियकर माझा टाकीं मनिंची चिंता ॥**
**चल तूं त्याजवळी ॥ सिद्धी कार्याची झाली ॥ १ ॥**

तो पहा रामचंद्राचें ध्यान करीत आहे. चल तिकडे.

( असें ह्मणून हनुमंताजवळ जातात. )

**जांवुवंत**—हनुमंता, स्वस्थ काय बसलास? अरे, रामचंद्राचें कार्य तुला करावयाचें आहेना? हनुमंता, तूं जन्मलास तेव्हां फळ ह्मणून सूर्याला खायाला गेलास, असें तुझें बळ असून आमचा अंत पाहतोस काय?

**हनुमान**—जांबुवंता, मग काय ह्मणतोस?

**जांवुवंत**—दुसरें कांहीं नाहीं, तूं लंकेंत जाऊन सीता देवीचा शोध करून ये.

**हनुमान**—ठीक आहे. आतां—

## साकी.

लंकेसी मी जाउनि आतां मारुनि दशवदनातें ॥
घेउनि येतों भेटायासी सीता रघुनाथातें ॥
काय मनीं तुमचे ॥ सांगा मजला हो साचें ॥ १ ॥

**जांबुवंत**—हनुमंता, तूं लंकेंत जाऊन सीता देवीला भेटून तिची कुशलवार्ता घेऊन ये. रावणाचा वध पुढें रामचंद्राच्या हातून होईल.

**हनुमान**—बरें तर, मी आतां जातों. ( असें ह्मणून जातो. )

**जांबुवंत**—अंगदा, हनुमान परत येईपर्यंत आपण ह्या पर्वताच्याच गुहेंत वास करूं.

**अंगद**—बरें तर चला.

( असें ह्मणून सर्व निघून जातात. )

### तिसरा अंक समाप्त.

---

# अंक चौथा.

( अशोकवनिकेंत बसलेली सीता राक्षसींसह प्रवेश करिते. )

**सीता**—काय करावें? आज सहा महिने होऊन गेले तरी रामचंद्राची स्वारी इकडे येऊन मला या बंदींतून मुक्त करीत नाहीं! हे प्राणप्रिया, माझा आपल्याला एवढा कंटाळा कां आला?

**पद्**–( ह्या विप्राच्या ) ह्या चालीवर.

**रविकुलभूषण दशरथतनया रोष कसा धरिला ॥ क्षमा करुनियां अपराधाची दर्शन द्या मजला ॥ आ-पुल्यावांचुनी जिव हा माझा व्याकुल कीं झाला ॥ बंदिशाळेमधिं साहूं कैसें आपुल्या विरहाला ॥ १ ॥**

हे प्राणप्रिया, माझ्यासाठीं आपल्याला फार श्रम होत असतील !!

**पद्**–( व्यर्थ मी जन्मलें ) ह्या चालीवर.

**रविकुलमंडण वीरमणी ॥ कष्टतसें प्रभु घोरवनीं ॥ ध्रु० ॥ श्याम मनोहर पुनरपि कधिं मी पाहिन या नयनीं ॥ १ ॥ कुदशा ऐसी आली तुजसी कारण ही ह्मणुनी ॥ २ ॥**

(तदनंतर हनुमान प्रवेश करितो.)

**हनुमान**–हीच ती अशोकवनिका. अहाहा ! किती रमणीय आहे !

**पद्**–( नोहे हा पवन ) ह्या चालीवर.

**पाहुनियां उपवन हें सौख्य वाटतें ॥ स्वर्गींचें नं-दनवन मजसि भासतें ॥ ध्रु० ॥ पक्षि मधुर शब्द करिति ॥ गुंजारव मधुप वरिति ॥ कोकिल मंजूल गाति ॥ रमणिय किति मयुर दिसति ॥ मम मन तें या स्थलिं बहु शांति पावतें ॥ १ ॥**

( पुढें पाहून ) अहाहा ! ! त्या लंकेनें सांगितल्याप्र-

माणें ही सीता बसली आहे. ही अगदीं कृश झाली आहे. व मुख तर निस्तेज झालें आहे. अहाहा !

**पद**–( थाटमाट सदनीं नवा ) ह्या चालीवर.

**जन्मुनि मम सार्थक तें आजि जाहलें ॥ यज्ञभूमिसंभव जी तिजसि पाहिलें ॥ ध्रु० ॥ धन्य जनक भूपतिचें भाग्य तें असे ॥ मूर्तीमती लक्ष्मी ती सदनिं वसतसे ॥ पाहुनि इस हृदयिं बहू सौख्य होतसे ॥ तनुकांतीनेंच सर्व वन हें शोभलें ॥ १ ॥**

आतां आपण ही काय करिते तें पाहूं. (असें ह्मणून वृक्षाच्या आड उभा रहातो.)

**सीता**–हे प्राणप्रिया—

**पद**–( त्या मदनमनोहररूपी ) ह्या चालीवर.

**प्रियकरा तुजवांचुनि तें मजलागीं चैनचि नाहीं॥ व्याकुळ हा प्राणकिं झाला दर्शन तें मजसी देईं ॥ त्यागिन ह्या प्राणासी तुजवांचुनि मी या समईं ॥ विरह प्रिया या वेळीं ॥ अंतरीं जाळी ॥ झडकरीं येईं ॥ जिंकुनि रिपु मजसीं नेईं ॥ १ ॥**

आतां एवढा समुद्र उल्लंघन करून आपण कसे येणार. तर मी आतां प्राण त्याग करून आपल्या भेटीला येतें.

**( अंजनीगीत. )**

**वनिं फिरतांना तवचरणांला ॥**
**कष्ट होति ते फार तयांला ॥**

श्याम सुंदर कोमल तनुला ॥
पाहिन कां नयनीं ॥ १ ॥

छे छे !! आतां कशाचे माझ्या दृष्टीस पडणार !! आतां प्राणत्याग करावा हें बरें. ( केसाचा पाश घालिते. )

**हनुमान**—

**पद**—( दीन जनाचा ) ह्या चालीवर.

रविवंशीं तो अयोध्येसी दशरथ करि राज्या तें ॥
सद्गुणि सुंदर पुत्रही चारी असती ते त्यातें ॥ ध्रु० ॥
ज्येष्ठ पुत्र तो राम तयाचा प्राणप्रिय पितयातें ॥ दुसरा सौमित्री कीं झाला सीता राघवकांता ते ॥ पित्राज्ञेनें राम लक्ष्मण आले जनस्थाना ते ॥ समागमें मग आली तयांच्या सुंदरि सीता ते ॥ १ ॥

**सीता**—(ऐकून) अगबाई, या मध्यरात्रीं मी प्राणत्याग करीत असतां माझ्या प्राणनाथाच्या कथेचें वर्णन कोण करीत आहे !! तें ऐकावें तरी—

**दिंडी.**

रामलक्ष्मण सन्नीध नसुनि ऐसी ॥
रावणें ती पाहूनि संधि तैसी ॥
तिच्या भुलुनी सौंदर्यसागराला ॥
हरुनि नेई दुष्ट तो जनकजेला ॥ १ ॥

**साकी.**

जटायु नामें पक्षी त्यानें पाहुनि सीता ऐसी ॥

सोडवितां मग दुष्ट राक्षसें अवलोनियां त्यासी ॥
मारुनियां त्यातें ॥ परतुनि गेला लंकेतें ॥ १ ॥

**सीता**—अगबाई! ही कांहीं तरी राक्षसी माया आहे.

**हनुमान**—

**अंजनीगीत.**

मगसीतेच्या शोधालागीं ॥
राघव हिंडे उपवनभागीं ॥
मोहें वृक्षाला आलिंगी ॥
विरहें व्याकुळ तो ॥ १ ॥

**दिंडी.**

ऋष्यमूकपर्वतावरी राम ॥
बंधुसहितचि पावला घनश्याम ॥
सूर्यनंदन सुग्रीव वानराला ॥
रामचंद्रें आपुला सखा केला ॥ १ ॥

**सीता**—काय चमत्कार हा! प्राणनाथांनीं जीं कर्में केलीं तीं येथें कोण सांगत आहे! छे छे; कोणी सांगत नाहीं हेंच खरें. मला भास झाला असेल.

**हनुमान**—

**अंजनीगीत.**

मारूनीयां शत्रु त्याचा ॥
राजा केला किष्किंधेचा ॥
शोध कराया मग सीतेचा ॥
वानर पाठविले ॥ १ ॥

## साकी.

मिळूनि ऐसे वानर सारे शोधिति त्या सीतेतें ॥
त्यांतिल एक मी वानर आहें आलों या लंकेतें ॥

**सीता**—हें काय!! मी स्वप्नांत तर नाहींना! छेछे, मी तर जागी आहें. तेव्हां कोणी सांगत आहे हेंच खरें. (इकडे तिकडे पाहून) येथें कोण बोलत असेल त्यानें माझ्या पुढें येऊन उभें रहावें. (हनुमंत पुढें येऊन हात जोडून उभा रहातो.)

**सीता**—(त्याला पाहून) अगबाई! हा काय चमत्कार! हें तर माझ्यासमोर वानर उभें आहे!!

**हनुमान**—हे देवी, मी रामचंद्राचा दास आहें. मी तुझ्या शोधाकरितां आलों आहें.

**सीता**—छेछे, तूं खोटें बोलतोस. मनुष्याची व वानराची कोठें मैत्री झाली आहे काय? तूं कोणी तरी मायावी राक्षस आहेस.

**हनुमान**—हे देवी सीते, तूं भलतीच कल्पना केलीस. मी राक्षस नाहीं. ही पहा रामचंद्राची खूण. (असें ह्मणून अंगुली तिच्या पुढें टाकितो.)

**सीता**—(पाहून दुःखानें) हे मुद्रिके, तूं रामचंद्राला सोडून कां आलीस?

**पद**—(निर्धनबहु) ह्या चालीवर.

सोडुनि कशि राघवासि आलिस ये स्थलीं ॥ त्या-

वांचुनिं दासी ही दीन जाहली ॥ ध्रु० ॥ प्रियपति-
विण मजसि आतां चैन तें नसे ॥ व्याकुल बहु प्राण
सखे जाहला असे ॥ शीतल हा इंदु असुनि ताप दे-
तसे ॥ कोमल ती सुंदर तनु हृदयीं बैसली ॥ १ ॥

हे सखे,—

## साकी.

( कंथ बिन कैसि अकेली मेरि जान ) ह्या चाली०

मनोहर दावि सखे प्रियकर ॥
कवणे स्थलिं गे वास तयाचा, सांग सखे मज खूण ॥
वाट पाहतां नेत्र किं शिणले, कंठिं असे मम प्राण ॥
युगसम क्षण हा अंतरिं जाळी, विरह कसा अनिवार॥
नयन सुधाकरवदन तयाचें, सुखवि मना तें फार॥२॥

( असें ह्मणून मूर्छित पडते. )

( सावध होऊन. )

**सीता**—अग सटवे,—

## पद.

( अरसिक किति हा शेला ) ह्या चालीवर.

निष्ठुर तूं सखे असती ॥ वाटे नच ती लज्जा तु-
जसी ॥ कोमल त्या अंगुलीसी ॥ लोपविती नखें
अरुणप्रभेसी ॥ सोडूनी आलीस कैसी ॥ दुर्दैवी तूं
मजसम होसी ॥ १ ॥

छेछे, मी हिला इतका दोष देतें हें बरोबर नाहीं, का-

रण, हिच्यामुळें माझ्या प्राणनाथाची खूण मला पटली. सखे मुद्रिके—

### पद.

( वेदाभ्यासी ब्राह्मण सारे ) ह्या चालीवर.

**दोष दिला मीं व्यर्थ वहु तो सखये या समयीं तुलागे ॥ ध्रु० ॥ अपराध किं हा मीं तव केला ॥ क्षमा करीं गे त्याची मजला ॥ रविकुलभूषण त्या रमणाला दावि आतां नयनीं मला गे ॥ २ ॥**

हनुमंता, आतां माझ्या मनाची खात्री झाली, तूं खरा रामचंद्राचा सेवक आहेस.

**हनुमान**—हे देवी सीते, मला क्षुधा फार लागली आहे, तर मला फळें भक्षावयास आज्ञा दे.

**सीता**—हनुमंता, ह्या उपवनिकेंत रावणाचा दरारा असा आहे कीं, इंद्रादिक देवांस सुद्धां एका फळास देखील हात लावण्याची शक्ति नाहीं. वायुही फळ किंवा पान पडेल, या भीतीनें जोरानें वहात नाहीं. आणि वनाचें रक्षण करणारे राक्षसही पुष्कळ आहेत. तेव्हां तुला फळें काढून घेतां येणार नाहींत. ह्मणून तूं खालीं पडलेलीं असतील तीं घे.

**हनुमान**—बरें आहे. आपली आज्ञा मला मान्य आहे. ( वंदन करून जावयास निघतो. )

( आपल्याशीं )

## साकी.

**विध्वंसुनियां अशोक वन हें टाकिन या समयासी ॥**
**दशकंठासी कळेल मग तें धाडिल तो युद्धासी ॥**
**राक्षस ते सारे ॥ होतिल हेतु पूर्ण खरे ॥ १ ॥**

(असें ह्मणून जातो.)

**सीता**—आज इतके दिवस दुःख भोगिलें त्याचा शेवट होण्याचा समय आला आहे. आतां लवकरच प्राणनाथांची भेट होईल. परंतु इतकें माझें चांगलें दैव कोठें आहे. (ऐकलेंसें करून) अगबाई, हा मोठा ध्वनि कशाचा होत आहे? हनुमंतानें तर कांहीं केलें नाहींना? त्रिजटेला तरी काय आहे तें पहावयास पाठवावें.

(असें ह्मणून जाते.)

(तदनंतर सभेंत बसलेला रावण प्रवेश करितो.)

**रावण**—प्रधानजी, या आपल्या नगरांत जो एक वानर आला आहे, व ज्यानें आपलें उपवन नष्ट केलें आणि पुष्कळ राक्षस मारिले, त्यास धरून आणण्याकरितां मेघनाद गेला आहे, तो अझून परत कां आला नाहीं बरें?

**प्रहस्त**—महाराज, आपल्या इंद्रजित महाराजांचा केवढा पराक्रम आहे! ज्यांनीं सर्व देव बंदींत टाकिले, त्यांना वानराची कथा काय? ते आतां त्यास बांधून घेऊन येतील.

(तदनंतर बद्ध केलेल्या हनुमंतासह इंद्रजित प्रवेश करितो.)

**इंद्रजित**–( वंदन करून ) तात, हा वानर आणिला आहे, याला आतां योग्य शासन द्यावें.

**रावण**–प्रहस्ता, या वानराला विचार कीं, तूं कोण ? आणि तुला कोणीं पाठविलें ? तूं आमचें उपवन नष्ट कां केलेंस ? व राक्षस कां मारिले ?

**प्रहस्त**–हे वानरा, आमच्या महाराजांसमोर तूं खरें बोल. तुला कोणीं पाठविलें ? उपवन नष्ट कां केलेंस ? आणि राक्षस कां मारिले ? हें सर्व खरें सांग. तुला आमच्यापासून अभय आहे.

**हनुमान**–रावणा, ऐक—

**दिंडी.**

**अयोध्यापति राम तो वनीं आला ॥**
**जानकीसह आश्रमीं वास केला ॥**
**राम नसतां हरिलि त्वां जनकजेला ॥**
**भाग हरिचा जंबुकें जसा नेला ॥ १ ॥**

आणखी रावणा ऐक. कुत्रा जसा यज्ञांतला हविर्भाग नेतो, तसा तूं तिला घेऊन आलास.

**साकी.**

**त्या रघुपतिचा दास मी आहें सीता शोधायाला ॥**
**आलों आहें या नगरातें गर्व तुझा हरण्याला ॥**
**उपवन छेदियलें ॥ समरीं राक्षस मारियले ॥ १ ॥**

हा माझा स्वभावच आहे, ह्मणून मीं असें केलें. अरे

रावणा! पहा, रामचंद्र सौमित्र आणि सुग्रीव तुझ्यावर क्रोधाविष्ट झाले आहेत; ह्याकरितां तूं रामाची स्त्री त्याला नेऊन दे. रावणा, तूं ज्ञाता, बुद्धिवान् आणि संपन्न असूनही असें अनुचित कर्म करून नाश पावतोस, हें पाहून मला वाईट वाटतें. ह्मणून तुला बोध करण्याकरितां आलों आहें. इंद्रजितानें मला बद्ध करून आणिलें आहे, असें तूं समजूं नको. ब्रह्मास्त्राची मला मुळींच बाधा नाहीं. तूं रामचंद्राला शरण जा, ह्मणजे तुझें कल्याण होईल.

**रावण**—काय हा वानर मूर्ख आहे! हा मला उपदेश करीत आहे! याला चांगली शिक्षा केली पाहिजे.

**हनुमान**—मूर्खा रावणा, हा रामचंद्राचा दास आहे. याला शिक्षा कोण करणार?

**रावण**—कोठचा राम? तो तर मनुष्य आहे. तो काय करणार आहे? यानें उगीच बडबड लाविली आहे. कोण आहेरे! याला येथून न्या आणि याचा वध करा.

**बिभीषण**—( हात जोडून ) राजन्, तो शत्रूचा दूत आहे. तेव्हां त्याचा वध करणें बरोबर नाहीं.

**रावण**—तर वानरास पुच्छाचा मान मोठा असतो. ह्मणून ह्याच्या पुच्छाला वस्त्रें गुंडाळून ह्याचें पुच्छ जाळून याला सोडून द्या.

**प्रहस्त**—आज्ञेप्रमाणें करितों. (असें ह्मणून हनुमंतास घेऊन जातो. )

**रावण**—मेघनादा, तुला फार श्रम झाले आहेत, तर कांहीं वेळ उपवनिकेंत विश्रांति घ्यावयास जाऊं.

(असें ह्मणून जातात.)

(तदनंतर अशोकवनिकेंत बसलेली सीता हनुमंतासह प्रवेश करितें. )

**हनुमान**—हे देवी सीते—

## साकी.

**उपवनिकाही नष्ट करूनी मारुनि राक्षस केलें ॥**
**दशकंठासीं भाषण लंका जाळुनि गर्वा हरिलें ॥१॥**

आतां मी रामचंद्राकडे परत जातों, मला आज्ञा द्यावी.

**सीता**—(दुःखानें ) हनुमंता, आतां तूं गेलास ह्मणजे मीं आपलें प्राणरक्षण कसें करावें ?

**हनुमान**—हे देवी, तूं येत असलीस तर मी तुला आतां घेऊन जातों. पहा.

**सीता**—हनुमंता, असें करून उपयोग काय ? असेंच झालें पाहिजे.

## अंजनीगीत.

**राघव येउनी या लंकेसी ॥**
**मारुनि समरंगणिं दुष्टासी ॥**
**नेइल जरि मज अयोध्येसी ॥**
**होइल कीर्ति खरी ॥ १ ॥**

तर हनुमंता, तूं जाऊन लवकर प्राणनाथाला घेऊन ये. तोंपर्यंत कसें तरी मी प्राणरक्षण करीन.

**हनुमान**–मला कांहीं तरी खूण दे. ह्मणजे मी तुला भेटलों हें रामचंद्राला खरें वाटेल.

**सीता**–हनुमंता, मी हा चूडामणी देतें. हा घे, आणि प्राणनाथांला दाखीव, ह्मणजे त्यांना खरें वाटेल.

**हनुमान**–बरें आहे. मी जातों आतां. ( असें ह्मणून वंदन करितो. )

**सीता**–हनुमंता, जा आणि लवकर प्राणनाथाला घेऊन ये.

**हनुमान**–ठीक आहे. ( असें ह्मणून जातो. )

**सीता**–आतां हें सर्व आनंदाचें वर्तमान त्रिजटेस सांगण्याकरितां तिच्याकडेसच जावें. (असें ह्मणून जाते. )

(तदनंतर राम, लक्ष्मण, सुग्रीव व वानर प्रवेश करितात.)

**राम**–( दुःखानें )

**पद**–( कांते फार तुला ) ह्या चालीवर.

**कैसा साहुं सख्या मज सांगे विरह निशीं दिवशीं ॥ भेटीची कीं आशा तीच्या आजवरि होती मजसी ॥ ध्रु० ॥ येति न कैसे सेवक अजुनी । प्राणप्रिय ती सुंदरी रमणी। असेल आतां कवण्या स्थानीं। हतभागी हा नेत्र भरोनी । पुनरपि पाहिल कां तिजसी ॥ १ ॥**

हाय हाय ! प्राणप्रियेः—

## दिंडी.

तुझा सखये मुखचंद्र रम्य तो गे ॥
चित्तसागरिं आणील भरति सांगे ॥
नयनकमला फुलवील काय माझ्या ॥
नाहिं आशा कल्पना सकल वांझ्या ॥ १ ॥

**सुग्रीव**—हे प्रभो रामचंद्रा, आपण शोक करूं नका. आपली प्रिया खचित जीवंत आहे. हनुमान कार्यसिद्धि करून लवकर येईल. तो कार्य न करितां कधीं येणार नाहीं.

( इतक्यांत केसरी वानर प्रवेश करितो. )

**केसरी**—( लवून प्रणाम करून ) महाराज, आपला मातुल दधिमुख आला आहे.

**सुग्रीव**—जा त्याला घेऊन ये.

**केसरी**—आज्ञा. ( असें ह्मणून आंत जाऊन दधिमुखासह प्रवेश करून ) हे महाराज बसले आहेत.

**दधिमुख**—( वंदन करून ) महाराज आपलें जें चिरकाल रक्षिलेलें, व ज्यांत मक्षिका सुद्धां प्रवेश करण्यास समर्थ नाहीं, असें जें मधुवन, तें कुमार अंगदाच्या आज्ञेनें वानरांसह हनुमंतानें नष्ट केलें, व सर्व माळ्यांना व मला पुष्कळ ताडन केलें. ह्मणून सरकाराकडे आलों आहें. माझी सरकारांनीं दाद ध्यावी.

**सुग्रीव**—( हर्षानें ) रामचंद्रा, आपली प्रिया खास जीवंत आहे. आणि ती आपल्याला लवकर भेटेल.

**राम**—राजा, हें तूं कशावरून बोलत आहेस.

**सुग्रीव**—रामचंद्रा, हा दधिमुख, वानरांनीं माझें मधुवन नष्ट केलें ह्मणून सांगण्याकरितां आला आहे. तेव्हां कृतकार्य हनुमान आला आहे, ह्मणूनच मधुवनांत वानरांनीं प्रवेश केला. नाहीं तर कोणाची शक्ति होती ? माझा उग्रदंड त्यांस ठाऊक आहे. (दधिमुखाकडे वळून) दधिमुखा, हनुमंतास सांग कीं, तुह्मी यथेच्छ मधु प्राशन करून शांत होऊन आमच्या भेटीला लवकर या. आह्मी तुमची मार्गप्रतीक्षा करीत आहों.

**दधिमुख**—आज्ञेप्रमाणें करितों (असें ह्मणून जातो.)

(नंतर हनुमंत, अंगद, जांबुवंत वगैरे सर्व वानर प्रवेश करितात.)

(ते राम, लक्ष्मण, सुग्रीव ह्यांस वंदन करितात.)

**राम**—(आनंदानें) हनुमंता, माझी प्रिया कुशल आहेना ?

**हनुमान**—हे प्रभो, सीतादेवी कुशल आहे. मी तिच्या शोधाला जात असतां मला वाटेंत पुष्कळ विघ्नें आलीं, परंतु आपल्या चरणकृपेनें मी लंकेंत जाऊन अशोकवनिकेंत सीतादेवीची भेट घेतली.

**राम**—सीतेची स्थिति काय आहे ?

**हनुमान**—ती अगदीं दीन झाली आहे. आणखी:—

**साकी.**

केशपाश तो कंठीं घालुनि सीता तव विरहानें ॥

प्राण द्यावया सिद्ध जाहली पाहिलि मीं नयनानें ॥
चरितचि जें झालें। सांगुनि तिजसी बोधियलें ॥१॥

मग तिच्यापुढें गेलों त्या वेळेस ती कशी दिसली तें सांगतों—

पद–( फुलें वेलीचीं ) ह्या चालीवर.

अती कृश झाली ॥ प्रिया तव मीं पाहीली ॥ध्रु०॥
दुःखित कीं तव कांता ती ॥ पाहुनियां मग मजप्रती॥
झाली विस्मित बहु चित्तीं ॥ मनीं दचकली। मुद्रिका करीं देखीली ॥ १ ॥

**राम**–हनुमंता, ती विस्मित झाली ह्मणून ह्मणालास तें कां बरें ?

**हनुमान**–महाराज, तिला अशी शंका आली कीं, मनुष्यांची व वानरांची मैत्री कशी झाली, परंतु मुद्रिका पाहिल्यावर खूण पटली.

**राम**–हनुमंता, आतां इतकें सांग कीं, रावणाचें बळ, संपत्ति आणि सैन्य किती आहे ?

**हनुमान**–तें कांहीं वर्णन करितां येत नाहीं, व सैन्य किती आहे ह्याची गणतीच करितां येत नाहीं. असें असूनही मी आपल्या कृपेनें—

साकी.

अशोकवनिका नष्ट करूनी राक्षस विलया नेले ॥

**सभेंत जाउनि दशवदनासीं संभाषण मीं केलें ॥**
**लंका जाळूनी ॥ आलों मग मी परतूनी ॥ १ ॥**

मग मी सीतादेवीकडे गेलों. त्या वेळेस तिनें हा चूडामणी खुणेकरितां दिला आहे हा घ्या ( असें ह्मणून चूडामणी देतो. ) मग ती मला नेत्रांत अश्रु आणून ह्मणाली– हनुमंता, प्राणनाथ लवकर येथें येऊन मला घेऊन जातील असें कर.

**राम**–( दुःखानें ) हनुमंता, प्रिया माझी वाट पहात असेल, तर चला लवकर निघण्याची तयारी करा. ( असें ह्मणून जातात. )

( बिभीषण चार प्रधानांसह प्रवेश करितो. )

**बिभीषण**–प्रधानजी, काय करावें? मी रावण महाराजांस त्यांच्या कल्याणाचा उपदेश केला, परंतु विषयासक्त व ऐश्वर्यमदानें धुंद झाल्यामुळें त्यास तो आवडला नाहीं. याचें मला वाईट वाटतें. तो रामचंद्र साक्षात् पुराणपुरुष विष्णु आहे. व लक्ष्मण हा शेष आहे. सीता तर जगन्माता रामाची चिच्छक्ति लक्ष्मी आहे. तिचा अभिलाष केला तर कल्याण कसें होईल?

**प्रधान**–महाराज, आपला धर्म जो त्यांचें कल्याण चिंतणें तो आपण केला, परंतु त्यांना पूर्ण ग्रहदशेनें घेरिलें आहे, त्याप्रमाणें ते वर्तन करित आहेत. परस्त्रीचा अभिलाष करून कोण तरला आहे?

**बिभीषण**–काय करावें? त्यांना माझा बोध न रुचून माझा वध करण्यास प्रवृत्त झाले. असो, आतां मी रामचंद्रास शरण जाऊन तो परमात्मा आपला सखा करीन. परंतु आतां तो कोठें असेल? बहुतकरून समुद्रतीरींच दर्शन होईल असें वाटतें. तर चला तिकडे जाऊं, व ती मनोहर मूर्ति पाहूं ( असें ह्मणून जातात. )

( समुद्रकांठीं बसलेले राम लक्ष्मण सुग्रीव सेनेसह प्रवेश करितात. )

**राम**–सुग्रीवा, काय करावें? हा समुद्र पहा केवढा भयंकर दिसत आहे! वानरसैन्य ह्याच्या कांठीं स्थापन कर, मग आपण तो उल्लंघन करण्याचा विचार करूं.

**सुग्रीव**–बरें आहे ( असें ह्मणून तसें करितो. )

( बिभीषण सचिवासह प्रवेश करितो. )

**बिभीषण**–( आकाशांतून ) हे रामचंद्रा—

**कामदा.**

भक्तवत्सला हे रघूवरा ॥
त्रिदश शरण ते तुजसिं श्रीवरा ॥
ध्यान आपुलें नित्य शंकरा ॥
दशरथात्मजा श्यामसुंदरा ॥ १ ॥

हे प्रभो रामचंद्रा, मी कोण आहें ऐका.

**पद**–( वैभव माझें नष्ट ) ह्या चालीवर.

तव शत्रूचा बंधु मी आहें शरण तुझ्या श्रीचरणीं॥
कृपाघना तूं भक्तजनांचा रक्षक कीं ह्मणुनी ॥ ध्रु० ॥

**सनकादिक मुनी सेविति ज्याच्या अंघ्रिपदा निशिदी नीं॥ब्रह्मानंदीं मग्न सदा जे झाले दुरितभया त्यजुनी ॥ स्थिति लय पालन उत्पत्तीचा कर्ता तूं असुनी ॥ मानवदेहीं अवतरलासी दुष्ट निशाचरदमनीं ॥ निर्भय आतां करिं निजदासा सकल भयातें हरुनी ॥ १ ॥**

हे प्रभो, मी तुह्मांला शरण आलों आहें. माझा बंधु रावण त्याला मी आपली पत्नी परत देण्याविषयीं बोध केला, परंतु तें न ऐकतां तो माझा वध करण्यास प्रवृत्त झाला. आतां मी आपल्याला शरण आलों आहें. माझें रक्षण करा.

**सुग्रीव**—रामचंद्रा, हा राक्षस मायावी कपटी असावा, ह्याच्यावर विश्वास ठेवणें योग्य नाहीं. ह्मणून त्याचा वध केला पाहिजे.

**राम**—सुग्रीवा, हा मला शरण आला आहे, तर याचा वध करणें बरोबर नाहीं. अरे, मला जर कोप आला, तर हें त्रैलोक्य एका क्षणांत जाळून भस्म करून टाकीन, मग याची कथा काय ? त्याला इकडे घेऊन ये.

**सुग्रीव**—बरें आहे ( असें ह्मणून बिभीषणास घेऊन येतो. )

**बिभीषण**—वंदन करून ( आनंदानें ) हे रामचंद्रा,

**दिंडी.**

दैव माझें उदयासि आजि आलें ॥
अति दुर्लभ चरण हे प्राप्त झाले ॥

**चरण रजका मघवादि इच्छितातो ॥**
**परी त्यांतें नच कधीं प्राप्त होती ॥ १ ॥**

**राम**—बिभीषणा, मी तुला प्रसन्न झालों, वर माग.

**बिभीषण**—रामचंद्रा, आपण प्रसन्न झालां तर मला इतकेंच द्या कीं आपल्या चरणाचें सेवन व स्मरण सदोदित असावें, आणि आपल्या मायेची बाधा मला होऊं नये.

**राम**—बिभीषणा, तूं ह्मणतोस तसेंच होईल, इतकेंच नाहीं, परंतु मी आतांच तुला लंकेचें राज्य देणार. सौमित्रा, समुद्राचें उदक घेऊन ये व याच्या मस्तकावर अभिषेक कर, ह्मणजे आजपासूनच हा लंकेचा राजा झाला.

**लक्ष्मण**—आज्ञा, ( असें ह्मणून तसें करितो. )

**राम**—सुग्रीवा, ह्या समुद्राच्या लाटा कशा भयंकर दिसत आहेत. हा आपल्याच्यानें उल्लंघन करवेल असें वाटत नाहीं. आतां कशाची मला प्रिया भेटते! हाय हाय! हे प्राणप्रिये—

**पद्**—( सार्थची ते वदती ) ह्या चालीवर.

**दर्शन दे मजसी ॥ सीते ॥ टाकुनियां मज तूं कां जासी ॥ ध्रु० ॥ अपराधाची क्षमा करुनियां ॥ झडकरी तूं गे ये धांवुनियां ॥ सौख्य होइल मज या ठाया ॥ अंतचि तूं किती तरी बघसी ॥ १ ॥**

**लक्ष्मण**—या सागराला गर्व झाला काय? हा मी

कोण आहें, हें जाणत नाहीं, ह्मणून हा मार्ग देत नाहीं, तर आतां माझें शौर्य पहा. आण माझें चाप इकडे, पहा, आतां याला—

## साकी.

**सोडुनि बाणा जाळुनि टाकिन मी या सरितापतिसी ॥**
**जादो मग ही सेना माझी याच्यांतुनि लंकेसी ॥**
**पहा तुह्मीं सारे ॥ माझें बल हें आजि खरें ॥ १ ॥**

( असें ह्मणून बाणाचा नेम धरितो. )

( इतक्यांत ब्राह्मणाचा वेष धारण करून समुद्र प्रवेश करितो. )

**समुद्र**—( वंदन करून ) हे प्रभो रामचंद्रा, मी आपल्याला शरण आलों आहें, तर माझा वध करूं नका. माझा जडस्वभाव आपणच निर्माण केला, त्यामुळें मी आपल्याला जाणिलें नाहीं, तर तो दोष मजकडे नाहीं. हें आपणच विचार करून पहा.

**राम**—समुद्रा, तूं ह्मणतोस तें खरें आहे, परंतु हा मीं बाण जोडिला आहे यास कांहीं तरी भक्ष्य दिलें पाहिजे.

**समुद्र**—रामचंद्रा, माझ्या दक्षिणभागाला एक द्वीप आहे. त्यांत फार दुष्ट प्राणी आहेत, तर त्यांवर हा बाण सोडा.

**राम**—बरें आहे. ( तसें करितो. )

**समुद्र**—प्रभो, आतां तुमचा हा नल वानर आहे तो फार कुशल आहे, त्याच्या कडून सेतुबंधन करा, ह्मणजे त्या-

वरून सेना खुशाल जाईल. मी जातों, (असें ह्मणून जातो.)

**राम**—सुग्रीवा,

## साकी.

सेतू बंधन सत्वर करुनी या नल हस्तें आतां ॥
लंकेमाजी जाउनि शत्रू पुत्रानुजसह वधितां ॥
पाहिन मग नयनीं ॥ कोमल सुंदर ती रमणी॥३॥

(सर्व जातात.)

**चौथा अंक समाप्त.**

---

# अंक पांचवा.

(चित्रसेन व अश्वसेन गंधर्व प्रवेश करितात.)

**अश्वसेन**—मित्रा, आज स्वर्गलोकीं व मृत्युलोकीं मोठा समारंभ चालू आहे याचें कारण काय असावें बरें?

**चित्रसेन**—मित्रा, याचें कारण आज सर्व आबालवृद्धांस समजलें असून तुला समजलें नाहीं, तेव्हां मोठें आश्चर्य आहे. अरे आज सर्व देव बंदींतून मुक्त झाले ह्मणून.

**अश्वसेन**—अरे मित्रा, रावण जिवंत असतां देव कसे सुटले?

**चित्रसेन**—अरे, आज रावणाचा वध रामचंद्रांनीं केला. तो युद्धप्रसंग अत्यंत वर्णनीय असा झाला.

**अश्वसेन**—मित्रा, तर मला तो युद्धप्रसंग कसा काय झाला, तें सविस्तर सांग.

**चित्र०**—अरे रामचंद्रांनीं नलाकडून सेतुबंधन करून ते लंकेत येईपर्यंत सर्व तुला माहीत आहेच. आतां पुढें सांगतों तें ऐक.

**पद**—( निर्धनतेनें लज्जा उपजे ) ह्या चालीवर.

**घेउनि मंत्री रावण तेव्हां बसला सौधावरी ॥ अवलोकितसे तो दुरी ॥ ध्रु० ॥ सेवक तेव्हां छत्रें धरिती रत्नखचित त्यावरी ॥ शोभे मंदिल तो भरजरी ॥ शुक मंत्री तो मग कीं त्यासी धरूनियां निजकरीं ॥ दाखवी सर्वहि ते केसरी ॥ अगणित सेना पाहुनि ऐशी राघवाचि्यापरी ॥ झाला विस्मित तो अंतरीं ॥ चाल ॥ सेना सिंधू मग नयनिं सख्या निरखुनी ॥ त्या समयीं राक्षस अंतरिं तो दचकुनी ॥ गेला ऐसें सत्वर रघुपति हें पाहुनी ॥ कोप पावला मग त्या समयीं फारचि कीं अंतरीं ॥ धनुष्य घेऊनियां करीं ॥ १ ॥**

मग मित्रा, रामचंद्रांनीं असा एक अचुक बाण सोडिला कीं, त्यानें रावणाच्या दाही शिरांवरील किरीट एकदम खालीं पडले. त्यामुळें त्याला लज्जा प्राप्त होऊन तो उठून अंतःपुरांत गेला.

**अश्व०**—मग मित्रा त्यानें काय केलें ?

**चित्र०**—मित्रा मगः—

## साकी.

युद्धालागीं राक्षस तेव्हां दशवदनें पाठविले ॥
येतां सर्वहि वानरचमुनें त्यांतें जर्जर केलें ॥
होतां निर्बल ते ॥ परतुनि गेले नगरातें ॥ १ ॥

मग रावणाचा पुत्र इंद्रजित व दुसरे पुष्कळ राक्षस युद्धास आले.

**अश्व०**—बरें, पुढें ?

**चित्र०**—मगः—

**पद**—( लाज येइ रजनिस ) ह्या चालीवर.

समरंगणिं तेव्हां तो मेघनाद आला ॥ राक्षसांसह त्या समर्थी गगनिं गुप्त झाला ॥ ध्रु० ॥ शरवर्षावचि वरुनी फार त्यांनिं केला ॥ हरिचमुचा अतिमोठा पराभव झाला ॥ जाणुनि कर्म हें त्याचें मनीं राघवाला ॥ प्रलयरुद्रासम तो फार कोप आला ॥१॥

मग मित्रा, काय झालें तें ऐकः—

## अंजनीगीत.

घेऊनीयां करिं चापासी ॥
रघुवर लावी शर तो त्यासी ॥
पाहुनि करणी मग ती ऐसी ॥
राक्षस घाबरले ॥ १ ॥

मग ते सर्व लंकेंत पळून गेले.

**अश्व०**–मग पुढें काय झालें ?

**चित्र०**–मग मित्रा, ती वानरसेना हत झालेली पाहून रामचंद्राला फार दुःख झालें. नंतर हनुमंतानें औषधिपर्वत आणून त्यांस सजीव केलें. मग हें वर्तमान रावणास समजलें त्या वेळेस त्यानें कुंभ निकुंभ प्रहस्त प्रधान असे मोठमोठाले राक्षस युद्धास पाठविले; व मग—

**पद**–( लाजविल सुर ) ह्या चालीवर.

**रघुविर मग तो पाहुनि त्यांसी ॥ लावी आपुल्या शर चापासी ॥ ध्रु० ॥ सौमित्रानें शर सोडोनी ॥ जर्जर करुनी ते समरंगणीं ॥ सर्वहि राक्षस टाकी वधुनी ॥ विजयी झाले त्या समयासी ॥ १ ॥**

मग आपली सर्वसेना हत झाली असें श्रवण करून रावण अत्यंत कोप पावून युद्धास आला.

**अश्व०**–बरें, पुढें काय झालें ?

**चित्र०**–अरे, मग रावण आणि रामचंद्र या दोघांचें युद्ध सुरू झालें, त्यामध्यें रावण आपल्या बिभीषण बंधूला पाहून फार कोप पावला. मगः—

**पद**–( शूद्र विप्रवर ) ह्या चालीवर.

**रावण मग तो शक्ति तेंव्हां टाकी बंधू वरती ॥ सौमित्रें हें पाहुनि तिजला घेई आपुल्यावर ती ॥ शक्ति लागुनि ती त्यातें ॥ मूर्छित पडला धरणीतें ॥ ॥१॥ पडला पाहुनि सौमित्रचि तो रावण येई पुढती ॥**

उचलूनीयां नेतां पाहे हनुमंतचि त्याप्रती ॥ आला बहुत कोप त्यातें ॥ ताडी त्यासि मुष्टिघातें ॥ २ ॥

मग त्या मुष्टिप्रहारानें रावण मूर्छित पडला. इतक्यांत हनुमंतानें लक्ष्मणाला उचलून रामचंद्रापाशीं नेलें. नंतर रावण सावध होऊन आपल्या सैन्यांत गेला.

**साकी.**

रघुविरबाणें दशकंधर तो जर्जर फारचि झाला ॥
लज्जित होउनि मग तो तेव्हां परतुनि नगरा गेला ॥
विजयी कीं मग ती ॥ झाली वानरसेना ती ॥ १ ॥

**अश्व०**—मग पुढें कसें झालें ?

**चित्र०**—अरे, मग काय झालें तें ऐकः—

**पद**—( चारा सोडुनियां ) ह्या चालीवर.

मूर्छित पाहुनियां बंधूला ॥ राघव विकलित झाला ॥ ध्रु० ॥ अंकीं घेउनियां त्या समयीं ॥ शोकें व्याकुल होई ॥ बोले वायुसुता बा येई ॥ तुजविण कोणि न पाही ॥ बंधुप्राणातें दे मजला ॥ आणुनि द्रोण गिरीला ॥ १ ॥

अशी रामचंद्राची आज्ञा होतांच हनुमंतानें द्रोणागिरि आणून लक्ष्मणास सजीव केलें. हें पाहून रामचंद्राला अत्यंत समाधान वाटलें. हें वर्तमान रावणाला समजलें मगः—

**पद**—( वसंतसेना हरिणी ) ह्या चालीवर.

उठला सौमित्रचि हें ऐसें ऐकुनि दशवदनातें ॥

कोप येउनी दूत पाठवी उठवाया बंधूतें ॥ कुंभकर्ण तो येउनि तेव्हां वंदी दशकंठातें ॥ मयजापति तो बोले तेव्हां जाईं वा समरातें ॥ भ्रात्राज्ञेनें आला मग तो घेउनि निज सेनेतें ॥ हरिसेना ती दुःखित झाली पाहुनियां असुरातें ॥ १ ॥

**अश्व०**–मित्रा, मग काय झालें?

**चित्र०**–मित्रा, ऐक. राघवाबरोबर त्याचें युद्ध सुरू झालें. मगः—

## दिंडी.

युद्ध बहुतचि तें समरिं त्यांनीं केलें ॥
जर्जरित तें हरिसैन्य फार झालें ॥
मग त्याचा राघवें नाश केला ॥
स्वर्गिं देवांतें हर्ष फार झाला ॥ १ ॥

मग बंधु पडला असें वर्तमान रावणाला समजलें, त्या वेळेस तो फार शोक करूं लागला. मग त्याचा पुत्र मेघनाद यानें पित्याचें समाधान करून दिव्य रथ प्राप्त होण्याकरितां होमास आरंभ केला. हें बिभीषणास समजलें तेव्हां तो रामचंद्रास ह्मणालाः—

पद–( अबला स्त्री ही ) ह्या चालीवर.

मेघनाद तो जाउनि जेव्हां बसला होमासी ॥ बिभीषणें हें पाहुनि ऐसें कथिलें रघुपतिसी ॥ रामें

**अश्व०**—मित्रा, पुढें काय झालें ?

**चित्र०**—

## साकी.

**हतवीर्यचि तो रावण तेव्हां होउनि त्या समयाला ॥**
**रघुनाथानें एक शरानें मग त्या स्थलिं वध केला ॥**
**स्वर्गीं सुरवर ते ॥ वर्षति हर्षें सुमनातें ॥ १ ॥**

नंतर स्वर्गीं देव, अप्सरा आणि ऋषि हे आनंद पावून त्यांनीं आपल्या नृत्यगायनास आरंभ केला; आणि ब्रह्मदेव इंद्रादि देव यांनीं रामचंद्राची फार स्तुति केली. नंतर रावणाच्या स्त्रिया व बंधू बिभीषण हे शोक करूं लागले. त्यांचें रामचंद्रांनीं शांतवन केलें. मग बिभीषणानें बंधूचा उत्तरसंस्कार करून शोकाचा त्याग केला. मग रामचंद्रांनीं सौमित्राला आणि सुग्रीवाला सेनेसह पाठवून बिभीषणास राज्याभिषेक करून सीतादेवीला आणावयास आज्ञा दिली आहे, ती आतां येईल. तर तो चमत्कार पाहूं चल.

**अश्व०**—ठीक आहे. ( असें ह्मणून जातात. )

( तदनंतर राम, लक्ष्मण, सुग्रीव, बिभीषण आणि सर्व सेना अग्नीपुढें उभी आहे अशा सीतेसह प्रवेश करितात. )

**राम**—सुग्रीवा, ही सीता एक संवत्सरपर्यंत या राक्षसाचे गृहीं होती, तेव्हां ही निष्पाप आहे असें मानून मीं हिचा स्वीकार कसा करावा? तर हिनें अग्निप्रवेश करून दिव्य करावें ह्मणजे मी हिचा स्वीकार करीन.

**सीता**–( हें ऐकून हात जोडून ) जर मी पतिव्रता निष्पाप असेन, माझें मन रामचंद्रावांचून इतर ठिकणीं गेलें नसेल, तर अग्नि माझा स्वीकार करो. ( असें ह्मणून लक्ष्मणास अग्नि प्रदीप्त करण्यास सांगते, तो तसें करितो. सीता अग्निप्रवेश करिते, हें पाहून सर्व सेनेंत हाहाकार होतो. नंतर सीतेसहवर्तमान मनुष्यवेष धारण करून अग्नि प्रवेश करितो. )

**अग्नि**–रामचंद्रा,

**साकी.**

**पतिव्रता कीं ममात्मजा ती योग्यचि जनकसुता ही ॥**
**झाली ह्मणुनी त्रैलोक्यातें वंद्य असे ही पाहीं ॥**
**रघुपति तूं आतां ॥ स्वीकारावी निजकांता ॥ १ ॥**

( असें ह्मणून अंतर्धान पावतो. )

**राम**–( सीतेला आलिंगून. )

**पद्**–( काय मला भूल पडली ) ह्या चालीवर.

**इच्छित तें पूर्ण खचित आजि जाहलें ॥ पूर्वार्जित पुण्यचि तें उदय पावलें ॥ ध्रु० ॥ मित्रात्मज प्राण-सखा साह्य होउनी ॥ सानुज दशमुख सपुत्र मृत्यु पावुनी ॥ भक्तराज राक्षसासि राज्य देउनी ॥ पुनरपि जें दुर्मिळ हें रत्न लाधलें ॥ १ ॥**

**सीता**–( रामाला आलिंगून त्याच्या हृदयावर मस्तक ठेऊन ह्मणते. )

**पद**—( आर्या तीच ) ह्या चालीवर.

अपराधी पदकमलाची दासी ही हतभागीनी ॥ कष्ट भोगिले या चरणांनीं कारण ही ह्मणुनी ॥ दुर्वचनें मीं व्यर्थ किं छळिलें तव अनुजालागूनी ॥ अपराधाची क्षमा करावी विनवी कर जोडूनी ॥ १ ॥

**राम**—छे छे प्रिये, असें ह्मणूं नको. कारण—

**पद**—( मरण बरें वाटतें ) ह्या चालीवर.

जीवित सखे आज तें ॥ पुनरपि आलें तनुतें ॥ध्रु०॥ तव विरहाच्या सागरिं हा गे ॥ बुडला होता आजवरी गे ॥ त्वांचि काढिला देउनि कर गे ॥ खचित अतां वाटतें ॥ १ ॥

आणखी पहा.

**पद**—( प्रिये कशी दैवाची ) ह्या चालीवर.

प्रिये पहा भाग्याचा मेघ उदय आजि पावला ॥ ध्रु० ॥ चातक हा फार तृषित ॥ जाणुनि हें हृदयिं सत्य ॥ तवरूपी जलचि बहुत ॥ खचित वर्षला॥१॥ आम्रतरु हा योग्य बघुनि ॥ वल्लरि तव तनु होउनि ॥ चढली या समयिं ह्मणुनि ॥ शोभुं लागला ॥ २ ॥

बिभीषणा, आतां अयोध्येला जाण्याची तयारी करूं चला.

**बिभीषण**—रामचंद्रा, आपण माझ्या नगरांत प्रवेश

करून मंगलस्नान व भोजन करून नंतर जाण्याची तयारी करावी. एवढी दासाची विनंती आहे.

**राम**—विभीषणा, मी तुझी विनंति मान्य केली असती, परंतु माझा बंधु भरत जटावल्कलें धारण करून माझ्या आगमनाची वाट पहात आहे, तेव्हां त्याची भेट झाल्यावांचून मी मंगलस्नान करीत नाहीं. तूं सौमित्र आणि प्राणसखा सुग्रीव यांना सेनेसहवर्तमान नगरास ने. ह्मणजे माझा सन्मान केल्याप्रमाणें होईल. तोंपर्यंत मी प्रियेसह त्रिकूट पर्वतावर उभा राहून तुझ्या नगराची शोभा पहातों.

**बिभीषण**—आपली आज्ञा मला मान्य आहे.

( असें ह्मणून लक्ष्मण, सुग्रीव व वानर यांसह जातो. )

**राम**—प्रिये, चल या त्रिकूट पर्वतावर उभें राहूं ह्मणजे नगराची शोभा उत्तम दिसेल.

**सीता**—ठीक आहे चलावें. ( असें ह्मणून जातात.)

( बिभीषणाचा कंचुकी प्रवेश करितो.)

**कंचुकी**—पहा, आमच्या महाराजांचें भाग्य केवढें! अहाहा! जो साक्षात् परमात्मा विष्णु तोच रामचंद्र, त्यास शरण जाऊन त्याला आपला सखा केला. रावण महाराजांचें तर भाग्य वर्णन करवत नाहीं. ज्या रामाचे चरण हजारों वर्षे तपश्चर्या करणाऱ्या ऋषींच्यासुद्धां दृष्टीस पडत नाहींत, तोच रामचंद्र या लंकेंत आणून त्याच्या हातून मरून आपण या घोर संसारांतून तरून मुक्तिसदन

मिळविलें! धन्य धन्य!! अरे पण मी बोलत काय बसलों. महाराजांनीं मला अंतःपुरांत जाऊन साक्षात् भूधर जो लक्ष्मण आणि सुग्रीवादि वानर नगरांत येत आहेत, तर सर्व तयारी आहे किंवा नाहीं हें पाहून ये ह्मणून सांगितलें आहे. तर ती सर्व तयारी आहे असें आतां मी महाराजांस जाऊन कळवितों.

( असें ह्मणून जातो. )

( इतक्यांत नल प्रवेश करितो. )

**नल**—अहाहा! धन्य भाग्य या बिभीषणाचें! याची नगरी पाहून प्रत्यक्ष अमरावतीसुद्धां तुच्छ वाटेल. संपत्ति पाहिली ह्मणजे दुसरा कुबेरच आहे असा भास होतो. अहाहा! काय त्यानें उत्तम सन्मान केला! भक्तीविषयीं तर दुसरा सौमित्रिच! अरे पण मी अझून येथें काय बसलों! हे पहा, रामचंद्र आपल्या प्रिय पत्नीसह व सुग्रीव बिभीषण, आणि सौमित्रि यांसहवर्तमान विमानांत बसून अयोध्येस जाण्यास निघाले आहेत, तर आपणही तिकडेसच जावें. अहाहा!

## साकी.

नंदीवहनावरि तीं दोघें शंकर गिरिजा जैसी ॥
किंवा गरुडावरती शोभति माधव कमला कैसी ॥
त्यापरि ममनीं ॥ भासे रघुविर या यानीं ॥ १ ॥

( असें ह्मणून जातो. )

(तदनंतर पुष्पक विमानांत बसलेला रामचंद्र सीतेसह प्रवेश करितो.)

**राम**—सखे—

**पद**—( त्या माझ्या मयूराला ) ह्या चालीवर.

**प्रिये पहा रणभूमीला ॥ पुत्रपौत्रसह दशवदनाचा या स्थळिं मी गे नाशचि केला ॥ ध्रु० ॥ बलसागर या सौमित्रांनीं ॥ वधिला इंद्रारी या स्थानीं ॥ पुढतीं पाहे सुंदरि नयनीं ॥ सागरिं सेतु हा गे रचिला ॥ १ ॥ प्रिये ॥**

आणखी पहा, या ठिकाणीं रामेश्वर स्थापन केला. हें पहा, या स्थळीं माझा सखा बिभीषण आणि सागर हे शरण आले.

प्रिये, ही स्वयंप्रभेची गुहा किती रमणीय आहे!

**सीता**—प्राणनाथ—

**पद**—( बाळा घालोनियां गळा ) ह्या चालीवर.

**आम्रवृक्ष सुंदर ते ॥ फलभारें डोलति ते ॥ कुसुमामृत प्राशनिं ते ॥ मधुप गुंतले ॥ १ ॥ मंदगंध पवन येत ॥ वृक्षतळीं उदक वहात ॥ मध्यभागिं भुवन दिसत ॥ स्फटिककांतिचें ॥ २ ॥ तरुवरि ते पक्षि बसुनि ॥ करिती अति मधुर ध्वनि ॥ ऐसें हें स्थान बघुनि ॥ सौख्य वाटतें ॥ ३ ॥**

तर हें रमणीय उपवन व ही जवळच इंद्रपुरीप्रमाणें नगरी दिसत आहे ही कोणाची?

**राम**—प्रिये, ही किष्किंधानगरी आहे, येथील वर्त-

मान तुला पूर्वी हनुमंतानें सांगितलेंच आहे. हिचा स्वामी हा माझा सखा सुग्रीव आहे. हें सुंदर मधुवन त्याचेंच आहे. प्रिये, हा पर्वत पहा, यावर आह्मीं चातुर्मास वास केला होता.

**सीता**—प्राणनाथ, इकडे पहा, हाच तो पर्वत; यावर मी आपले अलंकार वस्त्रांत बांधून टाकिले होते.

**राम**—प्रिये, या ठिकाणीं जटायूची व माझी भेट झाली. आणखी पुढें पहा, तो पंचवटीचा आश्रम किती सुंदर आहे !

**दिंडी.**

देवतटिनी रमणीय किती वाहे ॥
मुनीगण ते या स्थलीं वसति पाहें ॥
सौख्य होतें पाहूनि मम मनाला ॥
तुझ्यासहितचि मी पूर्वि वास केला ॥ १ ॥

**सीता**—मी नाहीं पहात. याच आश्रमांत त्या मेल्यानें मला हरण केलें. पण प्राणनाथ, इकडे पहाः—

**पद**—( किति कपटी अससी तूं सवती ) ह्या चा०

किति सुखवि मजसि हे चित्तीं ॥ कुसुमित सुंदर वल्लरि साऱ्या आम्र तरूवरि चढती ॥ ध्रु० ॥ पक्षि प्रियांसह आनंदानें ॥ सुस्वर गायन ज्यांवरि करिती ॥ १ ॥ किति ॥ पुण्यशील या आश्रमिं ऐशा॥ कोण तपोधन करि वसती ॥ २ ॥ किति ॥

आणखी पहा—